१८०३

# होळकरशाईंतील पोवाडे

हा

गोंधळ्य

या राज्यांतील गोंधळ्यांचे पोवाडे.

हे

रा० साहेब बाळकृष्ण आत्माराम गुप्ते

एफ. झेड. एस.

यांनीं

एकत्र मिळवून प्रसिद्ध केले.


७२०८

म. ग्रं. सं. ठाणें

| विषय | लेखक बा. आ. गुप्ते | सन |
| --- | --- | --- |
| कावणे | पुस्तकाचें नांव होळकरशाहीतील पोवाडे | १८०३ |
| संग्रहालय क्रमांक ९५३ | | |

# होळकरशाईतील पोंवाडे.

ह्मणजे

या राज्यांतील गोंधळ्यांजवळ मिळालेले पोंवाडे.

हे

रावसाहेब बाळकृष्ण आत्माराम गुप्ते एफ. झेड. एस.

यांनीं

एकत्र मिळवून प्रसिद्ध केले.

मुंबईत

गणपत कृष्णाजीच्या छापखान्यांत छापिले.

इसवी सन १८९३.

किंमत ४ आणे.

# होळकरशाईंतील पोंवाडे.

ह्मणजे

## या राज्यांतील गोंधळ्यांजवळ मिळालेले पोंवाडे.

हे

रावसाहेब बाळकृष्ण आत्माराम गुप्ते एफ. झेड. एस.

यांनीं

एकत्र मिळवून प्रसिद्ध केले.

मुंबईत

गणपत कृष्णाजीच्या छापखान्यांत छापिले.

इसवी सन १८९३.

किंमत ४ आणे.

# INTRODUCTION.

When Mr. Acworth's collection of *Povádás* was reviewed in the press, I noticed that he recommends the collection of similar poems. Acting on that hint I took hold of the apportunity afforded to me during Mr. Shaligram's presence at Indore for pushing the sale of his publication, and collected all the Indian bards or Gondhalis of the city and induced them to recite some of their verses. Giving Mr. Shaligram the necessary official and clerical assistance, I succeeded in making a small collection, and subsequently supplimented it by those I obtained from Maheshwar and Tarana during my visit on tour.

Maheshwar is the ancient capital of the Holkar Raj and is still inhabited by a number of the Gondhalis. The Hindi verse on Yashwantrao Holkar was first taken down by me at Tarana from a Bhopia and not from a Gondhali. Its second copy was obtained at Maheshwar.

It is interesting to note that I could obtain 5 poems on the late Maharaja Tukojirao Holkar, and two on the present Maharaja H: H. Shivajirao Holkar. These facts prove that the process of composing these verses is still going on in the capitals of the Marhatta States.

I was strongly inclined to dedicate this publication to Mr. Acworth, but as I am not personally known to him I refrained myself from taking the liberty. The public will, however, I beg, accept the fact that the appearance of this book before them is entirely due to his zeal and to the encouragement he has given to this cause at great personal inconvenience and pecuniary sacrifice.

Of the 19 poems I now publish, eleven are naturally on the Rulers of the Holkar-house, having been collected in their capitals, four on the Peshwas, and one each on the Bhosla, Gaikwad, Scindia and Pavár houses.

B. A. GUPTE.

*Indore.* 11*th July* 1893.

काण्ड १५

# प्रस्तावना.

मेहरबान ऑक्वर्थ साहेब म्युनिसिपल कमिशनर मुंबई यांनीं छापविलेल्या पोवाड्याच्या पुस्तकावर वर्तमानपत्रांत टीका प्रसिद्ध झाली तींत एतद्देशीय संस्थानांत राजधानीच्या शहरीं राजाश्रयानें गोंधळी लोक रहातात त्यांजजवळ आणखी पोवाडे मिळण्याचा संभव आहे अशी चर्चा आली होती. ही गोष्ट लक्षांत ठेऊन रा. रा. शाळिग्रामपंत सदर साहेबांचे मदतगार त्या पुस्तकास आश्रय मिळण्यासाठीं इंदुरांत आले होते त्यावेळीं येथील सर्व गोंधळी लोकांस बोलाऊन आणून आमच्या हाताखालील कारकूनलोक मदतीस देऊन शाळिग्रामपंतांसमक्ष कांहीं नवीन पोवाडे टिपून घेतले. पुढें महेश्वरमहालीं आह्मीं दौऱ्यावर गेलों होतों त्यावेळीं तेथील अमीन रा. रा. गोविंद महादेव, व १६ नंबरचा तुकोजी महाराजांवरील पोवाडा रचणार कवी नागनाथ केशव यांचे चिरंजीव बापुजी नागेश महेश्वर कचेरींतील कारकून, या दोघांच्या मदतीनें त्या जुन्या राजधानींतील आणखी कांहीं पोवाडे मिळविले. त्यांत हरीराव महाराज होळकर यांजवरील पोवाडा नंबर १९ याचें एकच कडवें मिळालें ही गोष्ट दिलगिरीची आहे. याचीं इतर कडवीं कोणी मिळऊन दिल्यास मराठी भाषेवर त्याचे मोठे उपकार होतील. श्रीमंत शिवाजीराव महाराज हल्लींचे होळकर सरकार यांजवरील पोवाडा नंबर १८ रचणारा हयात आहे तो आपलें नांव प्रसिद्ध करूं चाहत नाहीं. हा पोवाडाही अपुरा आहे. पुढील भाग अझून रचलाच नाहीं.

एकंदर १९ पोवाडे मिळाले आहेत त्यांत होळकरशाईवर ११, पेशवाईवर ४, भोंसलेमहाराजावर १ गायकवाडीवर १, शिंदेशाईवर १ व धारशाईवर १ असे आहेत. महेश्वर व इंदूर दोन्हीं शहरें होळकरशाईच्या राजधानीची असल्यामुळें या घराण्याचे ज्यास्ती पोवाडे रचले गेले हें साहजिक आहे. तसेंच मराठी राज्याचा अम्मल या प्रांतीं असल्यामुळें तुकोजी महाराजांच्या कारकीर्दीत पांच पोवाडे रचले गेले, आणि हल्लींचे श्रीमंत शिवाजी महाराज यांजवर नवीन पोवाडे रचण्याचा क्रम ज्यारीनें आहे ही गोष्ट लक्षांत ठेवण्याजोगी आहे. सातारा, पुणें व नागपूर या ठिकाणीं हल्लीं नवीन पोवाडे तयार होण्याचे साहजिक बंद झाले आहेत तरी महेश्वरास व इंदुरास हल्लीं कवनें रचणारे अस्तित्वांत आहेत, तसेंच कोल्हापूर, बडोदें, ग्वाल्हेर, धार इत्यादि मराठी राजधान्यांत असतील असें वाटतें. त्यांचा तपास करून त्यांजकडून हल्लीं प्रसिद्ध न झालेल्या चिजा तेथें रहाणारे कामगार वगैरे विद्वज्जन मिळवितील अशी आशा आहे.

या पुस्तकाच्या संबंधाचे 'प्रसिद्धकाराचे' सर्व हक्क विविधज्ञान विस्तार पुस्तकाचे म्यानेजर रा. रा. पुरुषोत्तम गोविंद नाडकर्णी यांची मराठी भाषेविषयींची आस्था पाहून त्यांस आम्हीं दिले आहेत.

बाळकृष्ण आत्माराम गुप्ते.

ता० ११ जुलई सन १८९३.

## पोवाडे.

### १ शिवाजी महाराज होळकर यांचा पोवाडा.

श्रीमंत शिवाजीराव महाराज । होळकरसाहेब बहादूर सिरताज ॥ नांव गेलें मुलखावर किर्तिगाज । जसे गोकुळांत अवतरले कृष्णराज ॥ धृ० ॥ केवळ सांबाचा अवतार । पुर्वी पुण्याई केलें तप थोर ॥ कुळस्वामी देवमल्हार प्रसन्न झाले । शहर इंदुरांत चवघडे वाजूं लागले ॥ संवत एकुणीसशें त्रेचाळीस । पुष्य नक्षत्र शनिवार दिवस ॥ शुभघडी वेळनक्षत्र खासें पाहिलें । अकरा वाजतांच गादीवर स्थापित झाले ॥ दोघे बंधु हे बरोबरीनें । जोडी खुले रामलक्ष्मण ॥ चौबाजूं फौजेचा घेर शिपाई ठेले ।चालती तोफा बंदुकीचे फेर सुटले॥ शहरांत होती जयजयकार । गुढया उभारिल्या घरोघर ॥ भरजरी मंडप दरबारामधीं लाविले । सोन्याचे खांब चौबाजूंस उभे केले ॥ अवघे घरदार झाडून । बसले आपआपल्या मिसलन ॥ पुढें नाचती कळावतीण दरबार भरलें । बहु आनंदानें चोपदार बडे जाव बोले ॥ १ ॥

महाराज बोलले मुखानें साफ । व्याजमिती केली माफ ॥ फौज रयत ऐकून मनामधीं खुषी झाले । बाळासाहेबांचा मान हुकूम आर्डर चालवले ॥ सदा धर्म नीति राजेंद्रासीं । त्याचवेळी न्याहाल केलें लोकांसी ॥ ज्याच्यावर फिरली नीगा दरिद्र दूर केलें । लक्षावधि रुपयांचें धन दरबारांत दिधलें ॥ गांवें जहागीर दिलीं लोकांस । मोत्याचे कंठे गण नाहीं त्यास ॥ भरजरी

एकंदर १९ पोवाडे मिळाले आहेत त्यांत होळकरशाईवर ११, पेशवाईवर ४, भोंसलेमहाराजावर १ गायकवाडीवर १, शिंदेशाईवर १ व धारशाईवर १ असे आहेत. महेश्वर व इंदूर दोन्हीं शहरें होळकरशाईच्या राजधानीची असल्यामुळें या घराण्याचे ज्यास्ती पोवाडे रचले गेले हें साहजिक आहे. तसेंच मराठी राज्याचा अम्मल या प्रांतीं असल्यामुळें तुकोजी महाराजांच्या कारकीर्दीत पांच पोवाडे रचले गेले, आणि हल्लींचे श्रीमंत शिवाजी महाराज यांजवर नवीन पोवाडे रचण्याचा क्रम ज्यारीनें आहे ही गोष्ट लक्षांत ठेवण्याजोगी आहे. सातारा, पुणें व नागपूर या ठिकाणीं हल्लीं नवीन पोवाडे तयार होण्याचे साहजिक बंद झाले आहेत तरी महेश्वरास व इंदुरास हल्लीं कवनें रचणारे अस्तित्वांत आहेत, तसेंच कोल्हापूर, बडोदें, ग्वाल्हेर, धार इत्यादि मराठी राजधान्यांत असतील असें वाटतें. त्यांचा तपास करून त्यांजकडुन हल्लीं प्रसिद्ध न झालेल्या चिजा तेथें रहाणारे कामगार वगैरे विद्वज्जन मिळवितील अशी आशा आहे.

या पुस्तकाच्या संबंधाचे 'प्रसिद्धकाराचे' सर्व हक्क विविधज्ञान विस्तार पुस्तकाचे म्यानेजर रा. रा. पुरुषोत्तम गोविंद नाडकर्णी यांची मराठी भाषेविषयींची आस्था पाहून त्यांस आह्मीं दिले आहेत.

बाळकृष्ण आत्माराम गुप्ते.

ता० ११ जुलई सन १८९३.

काव्ये

# पोवाडे.

## १ शिवाजी महाराज होळकर यांचा पोवाडा.

श्रीमंत शिवाजीराव महाराज । होळकरसाहेब बहादूर सिरताज ॥ नांव गेलें मुलखावर किर्तिगाज । जसे गोकुळांत अवतरले कृष्णराज ॥ धृ० ॥ केवळ सांबाचा अवतार । पुर्वी पुण्याई केलें तप थोर ॥ कुळस्वामी देवमल्हार प्रसन्न झाले । शहर इंदुरांत चवघडे वाजूं लागले ॥ संवत एकुणीसशें त्रेचाळीस । पुष्य नक्षत्र शनिवार दिवस ॥ शुभघडी वेळनक्षत्र खासें पाहिलें । अकरा वाजतांच गादीवर स्थापित झाले ॥ दोघे बंधु हे बरोबरीनें । जोडी खुले रामलक्ष्मण ॥ चौबाजूं फौजेचा घेर शिपाई ठेले ।चालती तोफा बंदुकीचे फेर सुटले॥ शहरांत होती जयजयकार । गुढ्या उभारिल्या घरोघर ॥ भरजरी मंडप दरबारामधीं लाविले । सोन्याचे खांब चौबाजूंस उभे केले ॥ अवघे घरदार झाडून । बसले आपआपल्या मिसलन ॥ पुढें नाचती कळावतीण दरबार भरलें। बहु आनंदानें चोपदार बडे जाव बोले ॥ १ ॥

महाराज बोलले मुखानें साफ । व्यक्षजमिती केली माफ ॥ फौज रयत ऐकून मनामधीं खुषी झाले । बाळासाहेबांचा मान हुकूम आर्डर चालवले ॥ सदा धर्म नीति राजेंद्रासी । त्याचवेळी न्याहाल केलें लोकांसी ॥ ज्याच्यावर फिरली नीगा दरिद्र दूर केलें । लक्षावधि रुपयांचें धन दरबारांत दिधलें ॥ गांवें जहागीर दिलीं लोकांस । मोत्याचे कंठे गण नाहीं त्यास ॥ भरजरी

नामी पोषाक सभेमधीं दिले । जागा जमिन देऊनी लोकांसि निहाल केलें ॥ २ ॥

चारघडी मागल्या दिवसास । स्वारी निघाली दर्शनास ॥ तोफखाना पागा खुप बाजुनें सजविले । बरोबर कदम टाकिती मलटणवाले ॥ बारा घाटीचे जवान कट्टे । कितीक पुरभय्ये किती मराठे ॥ घोड्यावरती स्वार घेऊन हातामधीं भाले । धांवत चाले धट्टे बांधिले । आर्दलींत शागीर्दपेशाभाट ॥ खुप सजला स्वारीचा थाट । सोन्याचे डागिने हत्ती घोड्यास घातीले ॥ भरजरी झुलाजीन घोड्यावर भिडविले । दोघे बंधु हे हत्तीवर ॥ उडे गुलाल होतो जयजयकार । चोपदार म्होर लिलकार । आघाडीस बोले ॥ बाराभाई रिसाला मागें पुढें । शहरच्या नरनारी झाडून ॥ उभे गल्लींत जमले वेगुन । पहाती रूप न्याहाळून ॥ बहुत खुषी झाले । मारकंडी आयुष्य महाराजासीं दिलें ॥ ३ ॥

पुढें बाराव्या तारखेस । बडे साहेब आले दरबारास ॥ दिली तांकीदही अवघ्यास । हुकूम सुनविले ॥ ऐकून दरकदारांनीं मान्य केले ॥ जी ॥ राजनीतीचा कायदा दाविला । बडे साहेब ऐकून चकित झाला ॥ टाळी वाजविली हातावर । खुशाल झाले । हार गजरे अत्तर आर्गजा प्रेमळ चालले ॥ जी ॥ दोन हत्ती दोन घोडे ज्यानं । नजर केले कंपनीनं ॥ ढाल तरवार पांची पोषाग जरीचे दिले । राजे रजवाडे रांगड्यानें कपडे केले ॥ जी ॥ झाडे झुंबर हंड्या गलास । महालामधीं खुपकेली आरास ॥ बिजलीची रोषनाई सत्रापासुन केली । दुरदूरचे लोक पहायासी चालून आले ॥ जी ॥ आंबुनें केला पोवाडा खासा । कधीं श्रीहरी पुरवील आशा ॥ शनिवारीं रात्रीस बसून जडल हें केलें । ऐकून मंडळी मनांत खुष झाले ॥ ४ ॥

से क्रा ७५ ८५
४१



## २ अहिल्याबाईचा पोवाडा.

अहिलेचा अवतार अहिल्याबाई झाली स्वर्गवास । करी रयत रोदना पुढें जगदेश होईल कैसं ॥ धृ० ॥

पुण्यश्लोकीं जगात्रवकी कीर्त तुमची देशांतरीं । देशोदेशीं तिर्थाचे ठाई किर्त केली नानापरी ॥ अन्नसत्र घाट देवळें बांधलें कळाकुसरी । महारण्य कोकंठाणें घडिवल्या बारवा[१] विहिरी ॥ नित्यदक्षिणा इच्छाभोजन ब्राह्मणास पुजन करी । धर्मनीत अवतार केवळ कीर्ति वाढवी कोठवरी ॥ सुखवस्तीनें हेत तयाचा दया वाढतो वनवास । गेला वृक्ष मोडून पक्षी बसती कोणा ठायास ॥ अहिलेचा अवतार० ॥ १ ॥

गोविंदपंत दादा खासे गडे बाईसाहेबाचे दिवाण । खासगी खर्चाचें दप्तर अवघें ज्याच्या स्वाधीन ॥ धर्मनीत अवतार कोणाची कवडी लाच नाहीं घेन । हे मुच्छद्दी कारभारी कुठवर सांगू आख्यान ॥ आप्पाशामध्यावे भवानीच्यात्रि महिपती ऐकून । जामदारखान्यामधीं तिघे राहतील एका नेमान ॥ दक्षिणा देयाचा हुकूम केला खंडोबावूस । अनुष्ठाना ब्राह्मण बसविले प्रत्येक ज्योतिर्लिंगास । अहिलेचा अवतार० ॥ २ ॥

अन्नछत्रामधीं कारभारी एक राजेश्वर भट सुज्ञान । ब्राह्मणाच्या पंक्तीचा समाचार घडोघडी घ्यावा त्यान । ब्राह्मणाची नित्य करी विनंति लागेल तें घ्या मागून ॥ माझ्या पदरचें काय जातें बाई अहिलेचें पुन्न । गरिबानगुरिबाची खबर घेतो तिंदा येऊन ॥ आणखीं उरलें अन्न देतो मागताती घ्या उचलून । अन्नछत्राचा कारभार एक शोभे राजेश्वरास ॥ जो कां जेवत नसेल द्यावा सरंजाम त्यास । अहिले० ॥ ३ ॥

---

१ पांयऱ्याच्या विहिरी.

काशीरावदादावर मोठा बाईसाहेबांचा हेत । भेटीच्या पक्षामधीं प्राण राहिला डोळ्यांत ॥ आले काशिरावदादा पडली दुसमानाला धासत । बसविले गादीवर भेट मग घेती रयत ॥ झाली नजरानजर आले मागती धांवत । एकापासून दहापांच अवध्यांशीं झालीभुत ॥ धन्याशीं मुजरा करून गेली मग आपल्या घरास । झाला हुकूम खाशाचा खबर केली चौकीवाल्यास ॥ अहि० ॥ ४ ॥

---

## ३ तुकोजी महाराज होळकर यांचा पोवाडा.

सवाई महाराज तुकोजी झाले । किर्ती नवखंडामधीं केलें ॥ नांव दुनियामधीं राहिलें कीं होळकरशाही । गगनांत हिरा हरपला करूं गत कांहीं ॥ धृ० ॥ होळकर जितके ह्मणावे शूर । सदां हातीं यशाची तलवार ॥ केले इंग्रज हे जरजर । मागें नाहीं हटलें ॥ खुपगाजविली तरवार रणामधीं तुटले ॥ जी ॥ तसे महाराज होते रतिवंत । रूपलावण्य हिऱ्याची जोत ॥ मोठमोठे लाट फिरंगी जरब लई झाले । तुटली आयुष्याची दोरी ह्मणूनया गेले ॥ जी ॥ काय तारीफ मी सांगू आज । कसें दर्यांत बुडालें जहाज ॥ लोक रडे धाई धाई ह्मणे संचित फुटलें । कसा कोपला श्रीहरी दया नाहीं आली ॥ जी ॥ जसे गोकुळीं कृष्ण खेळले तसे महाराज होऊन गेले । तपाअंती खूप राज्य त्यानीं केलें सवाई ॥ असा राजा पुढें पृथ्वीवर होणार नाहीं । जी ॥ महाराज होते सांब अवतार त्यांजविण सुनें दिसे इंदूर । शहरांत लोक तळमळती झाले गाई गाई ॥ गेले टाकून आमचे धनी करावे काई ॥ जी ॥ सवाई महाराज तुकोजी झाले ॥ १ ॥

शके अठराशें आठाचे सालांत । नांव संवत्सर धरलें गणीत ॥

दहा वाजतांचे आंत कैलासवासी झाले । झाला एकच हाहा-
कार सारी शाही गजबजले ॥ जी ॥ बापुसाहेब सरदार भले
त्याच वेळेस कामावर आले । फौजेचा बंदोबस्त केला जरन-
ली वाले ॥ जोडी हलकारे धाडून स्वार बोलविले ॥ जी ॥ अ-
वघे दरकदार मिळून । स्वारीची केली तयारी त्यानं ॥ पालखी
आणा जलदिन । उशीर लय झाला ॥ दिलाहुकूम अरदलीसी
कमर वसविले ॥ जी ॥ पालखींत नीजविले महाराज । सिरीं
बांधिला मंदिल खुपशिरताज ॥ शिरीं पेच मोत्याचा तुरा ज-
डाब भारी जडले ॥ लीलम पाचुचे कंठे गळ्यामधीं खुलले ।
जी ॥ सारी तयारी केली जाऊन । अवती भवती फौज दारुण ॥
सारे होळकर मिळूनसनी जमा तिथें झाले । उचलून पालखी
रस्त्यानें चाले ॥ जी ॥ सवाई महाराज तुकोजी झाले ॥ २ ॥

नाक्या नाक्यावर बसविल्या गेटा । सिपाई पलटणाच्या रो-
खिल्या वाटा ॥ खासे घोडे पुढं धांवती जीन वर भीडले । थय
थया नाचे पायामध्यें पैंजण बोले ॥ जी ॥ अर्दली चाले पुढं ग-
जघाट । वाजे नौबदीवर टिपरू थाट ॥ रिसाला बाराभाई मागंपुढं
हे भिडले । झाली एकच गर्दी पहायाजन जडले ॥ जी ॥ चप्रासी
सोटेवाले धावती । वाढवा स्वारी असें ह्मणताती ॥ हलकारे पुढं
धांवत चाले लगीवाले । वाजती हजारो बाजे एकसूर झाले
॥ जी ॥ दोही बाजूनें चवऱ्या ढळती । पालखींत निजले छत्रपती ॥
मोहोरा पुतळ्या ह्या उडविल्या गणीत नाहीं केलें । असे
प्रतिनिधी महाराज बहु पुण्यवालें ॥ जी ॥ कृष्णपुऱ्यांतून
स्वारी चालली । भर मार गुलालाची केली ॥ पुढं चोपदार भा-
लदार अघाडिस बोले । मोठमोठे सेट सावकार पहायासी आले
॥ जी ॥ सवाई महाराज तुकोजी० ॥ ३ ॥

संगत मानकऱ्यांचो झुंड । भवताली दृष्टी पडेना तोंड ॥

दिनदयाळबावू यानें हुकमाविण लांविलें । पोटोग्राफामधीं तसबीर रोखिलें ॥ जीं ॥ दोन दोन कोस गर्दी झाली दाट । गर्दी स्वारांची मिळेना वाट ॥ मा साहेबांच्या छत्रीपसीं स्वारी गेली । चंदनकाष्टें आणुन सरण रचलें ॥ जी ॥ तेव्हां सरणासी लाविली अगन । मग लवकर तोफ चेढ संगीन ॥ गरीब दुबळें मिळून नमस्कार केले ॥ अखेरचा मुजरा घेऊन मागें परतले । जी ॥ नगरच्या नारी तमाशा पाहती । अश्रु नेत्रांतुन टपटप वाहती॥ मुखीं रामराम ह्मणती मनीं हळहळले । अरे भगवंता तुवा वैर नाहीं केलें ॥ जी॥ काय सांगावे रायाचे गुण असी मूर्त नाहीं दिसणार । धर्माचें होतें घर गो ब्राह्मण बोले ॥ स्वप्नाची अवस्था दृष्टि नाहीं पडले ॥ जी ॥ आंवुनें जडन केली खासी । त्याचदिशीं गेला होता उज्जनीसीं ॥ मागें हकीकत झाली कसी त्याला नाहीं कळलें । लोकांच्या सांगण्यावरून जडनासीं जडलें ॥ सवाई० ॥ ४ ॥

---

## ४ तुकोजीराव महाराज होळकर यांचा पोवाडा.

खुदावंत तुकोजीराव महाराज । साहेब होळकर बहादुर शिरताज ॥ शुभदिन दसऱ्याच्या रोजीं स्वारीचा बेत । दसरा इंदुरचा असा नाहीं दुनियेंत ॥ जी ॥धृ०॥ वसा या गजराज हत्ती सजविला । सोंडेवर रंग मिन्याचा दिला ॥ भरजरी झुल हत्तीला संजापदार । गजघंटा चांदीच्या दोह्री बाजुच्यावर ॥ सोन्याचे गेंद जोडी हत्तीला। सबळ चांदीचे तोडे पायाला ॥ सोन्याचे चुडे दंताला नक्षीदार । चांदीचे साकळदंड केले अनिवार ॥ जी ॥ सुवर्णपदक गळ्यामधीं डास पदकाची माळ सोनवळ । सुवर्णमय साकळ्या गळ्यामधीं भार ॥ शोभे हत्तीला

ऐरावती गजथोर । सोन्याच्या कानपट्ट्या कानाला ॥ सिरीं जरिबुट गंडस्थळाला । गज नानापरी सजविला दिसे अनिवार ॥ लाखो रुपयांचा जोहार अंगावरजी ॥ चाल ॥ हत्तीवर अंबारी सोन्याची काय नक्षी मनोहरजी । एक खांब जडिताचा कळसज जमला तो आंबारीवरजी ॥ तावदान आरशाचें साधनी नक्षी वेलबुटावरजी । आंबारींत राव छत्रपती तुकोजी होळकर बहादुरजी ॥ जरि मंदील बांधले तुरा शोभे शिरपेजावरजी । सिंह आकृति मुखबिंदु ॥ गौरवर्ण स्वरूपसुंदरजी । जरिबुट बादली झगा जाळी संजाबावरजी ॥ पायजमा किनखावी नाडी जाळीचे गोंडे त्यावरजी । झुबका डावे कानामधीं बाळीमधीं लोलक सुंदरजी ॥ नीळ पाचुचा कंठा शोभे गळ्यामधीं मनोहरजी । जडावाचें कडें कोंदणी मणीबंदाच्यावरजी ॥ गळ्यामधीं मोत्याचा हार पडे प्रकाश हृदयावरजी । मोत्याचें जानवें सयलीच्या लडा तेज मनोहरजी ॥ असे तुकोजी महाराज राजे आंबरींत साजे होळकर बहादुरजी । पायांत सोन्याचा तोडा राजब्रीद प्रियकरजी ॥ चंद्र हृदयीं बसविला तो राणीसाहेबांची मोहोरजी ॥ दोहों बाजुनें चौऱ्या वारिती सेवक किंकरजी ॥ जडावाचे भुजबंद विंब चवरिचे पडे त्यावरजी । खवासखान्यामधीं दिवाण बसती पळसीकरजी ॥ बडे बाळासाहेबांचा हत्ती उजवे बाजूबरोबरजी ॥ शिवाजी महाराज नांव तयांचें चिरंजीव होळकर । सर कासीराव महाराज होळकर होते हत्तीवरजी ॥ डाव्या बाजुला बाळासाहेब आंबारींत हत्तीवरजी ॥ होळकरात्मज नांव सवाई यशवंतराव बहादुरजी । गोविंदराव खज्यानजी सरमानकरी त्या हत्तीवरजी ॥ सलामी एकवीस तोफवर । स्वारी निघता महालाबाहेर ॥ झाला वाद्यांचा गजर लागेना अंत । ही हुजूर स्वारी वर्णन करी पंडित ॥ १ ॥

पुढें चालली हुजूर स्वारी मानहत्तीवर मानकरी । पोषाक डौल अवरीं थाट त्यान केला ॥ सोन्याचे कडें गोफ कंठ्या मानकऱ्याला जी । साहेब नौबत् हत्तीवर रिसाला बाराभाईचा मोहोर ॥ असी स्वारी सजावटदार पोषाक त्याला । जरिमुंडासे पायजमे चुस्त[१] पायालाजी ॥ खांद्यावर भाले हातीं खंजीर बहाल शेल्याची खांद्यावर । असे भले लोक बहादर थाट स्वारीचा ॥ या फौजेमधीं बेंडबाज्याचा घोष उमटलाजी । मागे होत दान हात्तीवर । रुपये वाटती पसरून कर ॥ भिकारी याचक फार आनंद त्याला असिरवाद होळकर मोतीबाल्यालाजी । इतरराजे देशोदेशीं असा धर्म नाहीं त्या राज्यासीं ॥ करी तृप्ती सर्वत्रांसीं आनंद त्याला । मारकंडी आयुष्य असो महाराजालाजी ॥ चाल ॥ हुजूरस्वारीच्या पुढील निवेदन करी पंडित वर्णनजी । हुजऱ्यांची मंडळी पिकपात्र तबक हातीं घेऊनजी ॥ पुढें खासबददार सजावट आले कंबर बांधुनजी । चपरासी जासूद हलकारे चालती हाद्द समजुनजी ॥ पुढें जिलबा चालती पुढें रंगीत भाले बालम घेऊनजी । भरजरीचें निशाण फरारें लग्याजीलब झाडुनजी ॥ दंडाईत त्रिटेपटे जयाच्या भाल्यामधीं लावुनजी । कोतवाल घोड्याला सोन्याचे अलंकार झाडुनजी ॥ कितीकाला चांदिचे साती सडका पाई पयंजणजी । कोतवाल घोडे झोरे नाचती कलाबतुचे जीनजी ॥ मेवात्याच्या बोज्यामधीं भाले वरच्या थाट संगीनजी । नकीबदार चोबदार भाट गरजतात बंदीजनजी ॥ भालदार मोरमोरछली कितीअती वाजुनजी । कडाबीनीचें लोक चालला बेहडा थाट करूनजी ॥ बासरी बजाऊफड्याचा आरबी मर्फा चालेडीमकिनजी । ढोल तासे वाजती झांजा एक नाद गेला होऊनजी ॥ उंटावर नौबती नगारे घोड्यावर संगीनजी ।

---

१ तंग.

कालु कर्णे सिंग तुताऱ्या भेरि दिल्या ठोकूनजी ॥ खास कंपनी चालली आर्डर हुकूमाचा देस घालुनजी । जंगी पलटण कदम टाकिती संगन पाय उचलुनजी ॥ मुलकी पलटण स्वारी कराया आले जमाव करूनजी । रिसालेयाची पागा बारगीर हातीं भाले घेऊनजी ॥ उंटावर जंबुरे सजावट सांडणी झुले संगीनजी । अवऱ्या पुढें जरिपटका हात्तीवर विनि चढली जाऊनजी ॥ कुळस्वामी मल्हार पालखींत पुढें स्वारी मधुनजी । दिवट्या घेऊनी भुतें शेंकडों पालखीच्या जीलबीनजी ॥ वाघ्यामुरळ्या गानगाती देती भंडार उधळुनजी । स्वारीच्या मधिंम्यानें चालती तावदान १ ऐकुनजी ॥ स्वारी पुढें हुलेसार चालले जरिमंदिल बांधुनजी । चवरी अबदागीर त्याला दिली होळकर महाराजानींजी । सर राज्यांतील सुभे आले स्वारि दसऱ्याची साधुनजी ॥ सलामीस ठाकूर रजवाडे येती शहरीं चालुनजी । सजावट स्वारी चालली जाण अवऱ्यापुढें ढोल निशाण॥ दिला तंबू बडे साहेबानें त्या जंगलांत । स्वारीचें वर्णन करी रामचंद्र पंडित जी ॥ २ ॥

चहु कडुन तोफखाना लाविला । शमीचा वृक्ष मधीं साधिला । हात्ती खाशाचा चालला शमीपूजनासीं ॥ सलामीस बडा साहेब आला आडवा त्यासि जी । सलामी तोफा सुटल्या एकवीस ॥ हजारों बंदुकी त्या समयास आवाज धुर गेला गगनास । वर्णू काय त्यासी कानठळ्या बसल्या कितीकांच्या धुर फौजासि जी ॥ शमी वृक्षाचे पासीं जाऊन । उतरली स्वारी हत्तीवरून । लोड जाजम दिलें फरासानें बसायासी ॥ तव कदम मुलाजा ह्मणे चोपदार खाशासी जी । शहर इंदुरचें लाखों माणूस। जमा तीथ झालें त्या समयास॥ आले गांवोगांवचे आसपास। फौज

१ एक प्रकारचा बाजा आहे.

पाहायासीं । दोनदोन कोस गर्दी झाली चहु तरफासी जी ॥ महाराज करती शमी पुजन । पुज्या सांगितली उपाध्यानं । धुपदिप अक्षदा वाहुन शमीच्यापासीं ॥ मग खासे मंडळी पुजा हुकूम सर्वांसी जी ॥ चाल ॥ ब्राह्मणासीं दक्षणा तेव्हां शिरपाव दिले वाटुन जी । आंबारीमधीं महाराज बसले सर्व विधी साधुन जी ॥ लाखों जनाचे मुजरे शाही मधीं गेली पुकार होऊन जी । दिली बत्ती तोफखान्यावर एक गडगडाट झाडुन जी ॥ कडाविनी बंदुकी जंबुरे धुर आला चहुं बाजुन जी । सिलंगणाचें सोनें लुटलें विजया दशमी साधुनजी ॥ स्वारी परतली महाराजांची जग पाहती न्याहाळुन जी । देव किंवा राव पहावा जन्मामधीं येऊन जी ॥ हेला मारला ज्यास्थळीं हत्ती नेला हेल्या वरून जी । हारोहार दारूचे झाड लाविले दुतर्फेन जी ॥ हजारों मशाली स्वारी मधीं पाजळल्या झाडुन जी । छत्री मशाला मानकऱ्यासी एक एक चाले मीसलीनं जी ॥ दरकदार अफीसर बडे लोक दिल्या मशाली लावुन जी । दारूखाना सोडला हजारों झाड दुतर्फीन जी ॥ तारे आकाशामधीं निघती एक एक झाडांतुन जी । नळे हवाया सोडती सोज्वळ प्रकाश पडे झाडुन जी ॥ भोयनळ्याचे फुल चंद्रजोती प्रकाश पडे संगीनजी । गुब्बारे आसमानामधीं भरती गगन विलोकिती जन जी ॥ चरकीच्या दारुच्या जबर सरकांडा चाले झरकन जी । मार्गी चालतां दुतर्फी दारूचें झाड॰ लावुन जी ॥ छत्रीपुऱ्यावर मह्‌ नाक्यावर स्वारी आली चालुन जी । दुतरफासीं तट्या बांधल्यां दिप पंत्या लावुन जी ॥ चंद्रजोती नळे हवाया चहुंकडे प्रकाश पडे झाडुन जी । नक्षत्रांमधीं चंद्र शोभले तुकोजीराव् मंडनी जी ॥ ऊंस केळांची गुजरी भरली गंधी अत्तर मांडुन जी । फकिराच्या तकियामधीं आरास दिप पाजळली झाडुनजी ॥

स.का१०५
स.८५



एकसारखी आरास कागदीपुरा कलाली पुनजी । हाळदीबाजार मोठा चौक सराफी घ्या ऐकुनजी ॥ गलास हांड्या झाडें झुंबरें लाविली दिपसंगीनजी । गुलालाचे थैले उधळती सेट सावकार हौसेनेंजी ॥ शहरच्या नरनारी झाडुनी उभ्या गलींत जमल्या वेधुन जी । पहाति स्वरूप न्याहाळुन आंबारींत महाराजांचें रूप चंद्र हिऱ्याची जोतजी ॥ गोपाळमंदिरापासून स्वारी आली चालुनजी । कमान दरवाज्यांतुन हात्ती आंत गेला । महाराज उतरले चौकांत आनंद झालाजी ॥ पुढें ललकारी चोपदार । न कीव त्याच्या मोहोर । तीथ गाण्यांचा गजर भाटांनीं केला ॥ खिजमतदार हुजरे उभे पुढें सेवेलाजी । कोठीच्या सुना आरती घेऊन ओंवाळिती महाराजांलागुन ॥ मोहरा पुतळ्या देऊन बोळविलें त्यांला जसा कृष्णाचें गोकूळ आनंद झालाजी ॥ जसें इंद्राचेंग इंद्रपुर प्रतिमा असं शहर इंदूर । या महाराजांपासून थोर चढले नांवाला । गेली छावणीपावेतों वस्ती मेळ घातलाजी ॥ या छावणीग पासून साडेबारा छावण्या आहे जाग । मुकत्यार राणीसाहेबानें केलें महाराजाला । होळकरी हुकुमामधीं ऑर्डर चालविलाजी ॥ झांसींचा राजा तिथं आणुन बंदोत दिला । महाल बांधुन केलें इंग्रजानें स्वाधीन संभाळी याला । नजरकैद ॥ महा० ॥

---

## ५ पुणेंशहरच्या वर्णनाचा पोवाडा.

चवप्रहरामधीं गस्ती हिंडती या पुणें शहरीं । जशी पेशव्यांची भारी ॥ धृ० ॥ दखनामधीं एक शहर घ्या ऐकून । नानाभाऊंचें पुन ॥ वाघबकरी पाणी पिती त्याच्या जरबीन । काठीला बांधुन सोन । ठाईठाई चौक्या बसल्या उभ्या रस्त्यानें

गर्दी रोहिले पठाण। सव्वाप्रहर दान वाटलें तखती वसून। त्यांच्या पुण्याला काय ऊन ॥ घड घड घड घंटा वाजती घड्याळ परमाणं । तमासे होती आनंदान ॥ चोरी चोरानीं करून मनसोब आपल्या मनांत । चला जाऊं शहर पुण्यांत ॥ कोण्या वेशीनें जाऊं चोर मनीं विचार करी । जमी पेशव्याची भारी ॥ चवप्रहरामधीं० ॥ १ ॥

चारी चोरानीं करून मनसुब आपल्या मनांत । सिरले शहरपुण्यांत ॥ चारी रस्ते हिंडुन आले चोर झाले भयाभीत । परतुन आले चौकांत ॥ असा शेट सावकार पाहिला त्यानें भाग्यवंत । सिरले त्याचे वाड्यांत ॥ उचलली देवपुजा मागुन फोडली भिंत ॥ माल काढिला करोडगणित । सोनें रुपें वस्ता भावा जडजवाहिर। बासनां नाहीं लाविला हात ॥ शीरीं घेतल्या मोटा कसे उतरले भिंत । परतुन आले रात्र माणिक चौकांत ॥ कोण्या वेशीनें जाऊं चोर मनीं विचार करी । जमी पेशव्यांची भारी० ॥ २ ॥

त्या चोरानें पलंग आणुन केला तयार । माल घातला वर ॥ वरती टाकीला शेला पान अबीर मढें केले साजरे । चवघेजण होऊन वोडके घेऊन खांद्यावर ॥ मशाल लाविली म्होर । हातीं शिकाळी गळ्यांत जानवें नेसुन धोतर। कसे रडति मावखोर ॥ आले चौकीपासीं आह्मांला जाऊंद्या लवकर। फार झाला ऊसीर ॥ चौकीवाला ह्मणे आह्मीं हुकमीं चाकर। खचीत व्हावें खिनभर ॥ तोडूं जानवें फाडूं धोतर। जाऊं फिर्याद सकाळ बुडऊं तुमचें घर । कोतवाल भ्याला मनीं दिले बाहेर काढुन ॥ गेले आद कोसावर । आद कोशी जाऊन मामलत वाटली सारी ॥ जमी पेशव्या० ॥ ३ ॥

सकाळींच उठून कळलें सावकाराला । जीवाचा आकांत के-

ला ॥ डोई मधीं धुळ घालुन नाना भाऊपासीं गेला। चोरान माझा माल नेला ॥ येवढी माझी जप्री चोर कुणीकडून आले । पुसा- या चौकीवाल्यांला ॥ चौकीवाले आणुन उभे केले कचेरिला । कोरडे लावले त्याला ॥ कां मारितां धनी साहिब आह्मां गरि- बाला । चोरानें तुमचा माल नेला ॥ दोप्रहरांचे आमलामधीं ब्राह्मणाचा मुडदा गेला । परतुन मागें नाहीं आला ॥ तधीं पा- सून रातचा मुडदा मना केला । आज्ञा दिली तोफेला ॥ गंगु नरसु ह्मणे नागेश्वरा घाला स्वारी । जप्री पेशव्याची भारी० ॥४॥

---

## ६. तुकोजी महाराज होळकर यांचा पोवाडा.

बाईग इंद्राचें इंद्रासन । शहर इंदुर वस्ती गुलजार ॥ मा- ळवा मुलुख छान हवा खुप खासी । जसे कृष्णाचें गोकुळ लोक सुखवासी ॥ जी ॥ धृ० ॥ शहर इंदुरची छबी हाये न्यारी । उडे वाहुवा दरवाज्यावरी ॥ सभोंवतीं बुरूज चार आकाशीं गेले । कमानी दरवाज्यापुढें गुजरी जरयलें ॥ जी ॥ नजरबागेच्या कोनावर । आले ते गोपाळमंदीर मोहर । नरनारी घेती दरशन कथा नित्य चाले ॥ असी सीतळ छाया पाहुन मन स्थीर झालें ॥ जी ॥ मुलुख सर होळकारानें केले । दिल्ली अ- टकावर झेंडे लाविले । भाल्याच्या आणीनें इंग्रज ज्यार केले ॥ असें तप भासी महाराज होऊन गेले ॥ जी ॥ खुप महाराजांनीं केलें नांव । सांगता अंत लागेना ठावं ॥ मोठमोठाले दरबार मागे नाहीं हटले । लाट फिरंगी अवघ्याचे बंद हे तुटले ॥ विलायती गोरे चालुन येती । टोपी उतरुन हातांत घेती । असा पहिल्यापा- सुन बडेजाव चालत आला ॥ महशूर नांव कीर्ति दूर गेलें जी । बाईग इंद्राचें० ॥ १ ॥

आणल दरबार जबलपुराचा ॥ महाराजानें बेत केला जाण्या-चा । सोन्याचे डागिने नवीन हत्तीघोड्यांला ॥ दिला हुकूम महाराजानं तयारीला ॥ लाखों रुपयांचे जवाहीर । चांदिसोन्याचे केले तयार । भरजरी झुला नवीन केल्या हत्तीला । नानापरी कशीदे काढिले बूटल्याला ॥ स्वारी हिंडती गांवोंगांवीं । जासुद हलकारे धांवती पाई ॥ अडवाटें हत्ती चालतो वाहती नदी-नाले । मिळेना पाणी पियाला खतकर झाले. ॥ कीरसान नित्य करिती हाला । मिळेना पाणी बागाइताला ॥ तेव्हां महाराजांनीं बसून मनसुबा केला । पाटील पटवारी दिली ताकीद अव-व्याला ॥ तलाव नीवाण कुवा बावड्या । बांधिल्या चिरेबंदी ॥ घ्या ओड्या आदि लाउन रुपया मुलुख अबाद केला । लाविलें काम नेमावर मुलुख वाढविला ॥ बाइग इंद्राचें इंद्रासन ॥२॥

कीर्ती केल्या अपरंपार । असी महिमा वर्णी कुठवर ॥ शह-रांत आणिला नहर । रयत खुशी केली ॥ नाक्या नाक्यावर चिरेबंदी हौद बांधिले । मुंबईहून सुतयंत्र आणविलें ॥ रुपये लक्षावधि खर्च केले । कळसुत्र हे फिरती अकल गुंग झाले ॥ कापड त्या यंत्रापासून पैदा केलें । छत्री पुढें घाट बांधिला ॥ कळा निपुण नक्षीच्या केल्या । दोही नदीचा उगम पुलापाशीं झाले ॥ बनविला वर मारकेट हवा खुलले । मल्हारगंजांत मि-स्तरीखाना ॥ टळती तोफा बरुदखाना । काम अघटीत हे ब-नवीलें कीर्त दूर गेली ॥ टाकसाळ यंत्रापासून रुपये घडविले । महाराज अकलवंत बुद्धीवाले ॥ हुकुम सोडवा राखावयावर केले। अशी पूर्ण कृपा राणीसाहेबाची महर झाले ॥ चंद्र हृदयीं बसविला खुशीनें दिले । बाई० ॥ ३ ॥

रेलगाडी आली माळव्यांत । पुल बांधिला नर्मदेंत ॥ क्विति वेळ उठला इंग्रज जरजर झाला । सिंदेहोळकरांनीं केली पूजा

पूल बांधिला ॥ महाराज होते बुद्धीचें घर । इंग्रज कांपतसे थरथर ॥ नांव महशूर मुलखावर जरब शत्रूला । यशवंत महाराजानं मुलुख सर केला ॥ जागोजागीं मंदिर बांधिलें । ब्राह्मण अनुष्टानासि बसविले ॥ इंग्रजी विद्याभ्यासास घातली शाळा । डाकतरखाने बनविले सुख झालें लोकांला ॥ अंबुजीनें नवीन केला ख्याल । लाविली चाली वरती चाल ॥ हातांत घेऊन चंग रंग जमवीला । ऐकून नागेशा मनांत अंकित झाला ॥ बाई० ॥ ४ ॥

---

## ७ जनकोजी सिंद्यांचा पोवाडा.

राव जनकोजी जनकोजी दृष्टिं पडले । जणुंकां सूर्य उगवले ॥ राव जनकोजी० ॥ धृ० ॥ कृष्ण सावळा । सावळा शेषशाई ॥ आकृती छबी बकेशाई । पगडी कंगणीदार चमकावी ॥ सिरीपेंच तुरा लावी । गळ्यामधीं कंठा शोभा देई ॥ पाचू हिरकण्या ठायीं ठायीं । कडे कंगण्याहिरे जडले ॥ जणुं कां सूर्य उगवले ॥ राव ज० ॥ १ ॥

अहो राव गोरकीच बैठला पढान्यारी । हवासीर बागेसेजारीं हो । रमणूक जागा रमणूक जागा मनीं रिझले गंगा जमुना ॥ जमुना जळ गेहरी मधें शोभे बारद्वारी । मोगरा गुलाब गुलाब आहे भारी ॥ केवडा चापा हारोहारी । रमणूक जागा जागा मनीं रिझले ॥ जणुंका सूर्य उगवले ॥ राव जनको० ॥ २ ॥

अहोराव नाथ प्रसन्न प्रसन्न सिंद्याला । मनसुब साहेब रखवाला ॥ जनक हा राजा देण्याला । देवजी लागे चरणाला । दर्शन व्हावे-व्हावे नेत्र शिणले । जणुंका सूर्य उगवले ॥ राव जनकोजी० ॥ ३ ॥

कष्टीं फळ तंपातीं केलें राज्य । होऊनि गेले शाहुमहाराज ॥

शाहुचें देणें श्रीमंताला साज । बावन पागा दिली फौज ॥ त्यां-तले मानकरी त्यांत माझे स्वामीराज । नित्य पंक्तीचें ताट रोज ॥ बरें नाहीं झालें आला प्रदेश संचित्ती । सख्याची वाट पाहू किती ॥ गेले श्रीमंत फितूर मातला नागपुराहून ॥ राज्य बुडविलें मुच्छद्यानें । नागपंत दिवाण मोठे धनलोभी ब्राह्मण ॥ गाळे गिळिले हात घुसळिले । उपाध्या झगे भेट शिवाला ॥ गा-इचें शेंपुट तेव्हां विश्वास आला ॥ राजास कोण्या खंडांत आला फिरंगी आंग्रेज ॥ उतरलें पेशव्याचें तेज । बरें नाहीं झालें आला० ॥ ४ ॥

तपा भंग झाला आला राजाला खेद ॥ सुभेदार लढे गणपत-राव । राजाचा पिंजरा नेऊन ठेवाव ॥ दाव तुझ्या खजिन्याची पेंव ॥ दुध पेढा याला वर अन्न न द्याव॥पाणि पिंजऱ्यांत पा-जाव ॥ पिंजरा घेउनि याला काळें पाणी दाव ॥ पिंजऱ्यासहित बुडवाव ॥ असि जाचणा मी कोठवर सांगाव । सांगतां येत अं-गाला हींव ॥ राजा राजा करता राजा दिला तुमच्या हातीं ॥ स-ख्याची वाट पाहूं किती ॥ गेले श्रीमंत० ॥ ५ ॥

चांद्यावर गेला देवि घेतली पालथी । तुलयां आलि क्रियानष्ट तिच्या होमांतून पैसा निघाला सुर्ती । बिन हुकमानें चाले गुप्ती । असे हे पैसे दोन पैसे पदर देती । पुढें तीन गांव टिपती । संगें घे-ऊन माझे पती ॥ सख्याची वाट पाहूं किती ॥ ६ ॥

---

## ८ शाहुमहाराजांचा पोवाडा.

शाहुछत्रपति राजा तयावर कोपले भगवंत । सोडुन सातारा पुणें चालले काशीखंडांत ॥ धृ० ॥ इंग्रजानें फितुर मांडला जाऊन साताऱ्यांत । जाग नसीब इंग्रेजाची किसमत शाबुत ॥ सकळ एक ज्याचे हुकमांत । रतीमुळें फुट पडेल ओका राजाचे

महालांत ॥ धाकला बंधूफितुरांत । मोडे श्रीछत्रतोडा सोन्याचा शोभिवंत ॥ जी ॥ आपका कर्माची मात । सोडुन सातारा पुणें चालले काशीखंडांत ॥ शाहुछत्रपति० ॥ १ ॥

शाहुजी अतरीं उदास झाले । धाकल्या बांधवासीं राज्य दिलें ॥ नगराबाहेर निघाले । मिळुन नगरचे लोक नेत्रीं सारंग लागले । प्रजापति कोणीकडे चालले ॥ शाहुछत्रपति राज्य कोणासीं दुःख नाहीं दिलें । आमच्या भाईस धनी केले । जसी रांडबायको आहेवपण आजच बुडालें ॥ गाईविणा वासरूं हुंबरलें । जसी मायलेंकरास टाकुन असिरवाद बोले ॥ राजा पडला विचारांत । सोडुन सातारा पुणें चालले० ॥ २ ॥

सातान्याहुन निघाले।करून कुचावर कुच मुक्कामास । त्रिंबकास आले । येतांच भोळ्या शंकरास पाहिलें ॥ धन्य धन्य ईश्वरा कोण्या दुःखानें राज्य गेलें । धरत्री पीक नाहीं पाहिलें ॥ जी ॥ नानापरिचे पहाडपर्वत आज दृष्टिस पडले । जसे राम वनवासा गेले ॥ पांडवासी वनवास वखत बाई द्रौपदिसीं पडले । कर्म हरिश्चंद्राचें नटळे ॥ असे अवतारधारी राजे डोमाघरीं पाणी भरले । राजा पडला विचारांत । सोडुन सातारा० ॥ ३ ॥

त्रिंबकाहुन निघाले एक मजलीवर गंगानासिक त्या ठायीं आले । येतां आंघुळ गंगेची देउन दान दक्षणा ब्राह्मण वाटे लावले ॥ नासिक शहरामधीं फिरले । श्रीमंताची हवेली पाहुन गहींवर दाटले ॥ असे असे दिवाण होते आपले । आज आमच्यावर वखत पडला कोणीकडे गेले ॥ बावन उमराव कोणीकडे गेले । सिंदेहोळकर दोनी मानकरी माळव्यांत पडले ॥ राजा पडला विचारांत । सोडुन सातारा पुणें चालला काशीखंडांत ॥ ४ ॥

---

## ९ गायकवाडांचा पोवाडा.

स्वामी गेले भरनवती सोडुन । तपती नर्मदा पलिकडे उतरुन ॥ दक्षिण टाकुन गेले गुजराथप्रांतीं । लागलें लक्ष पतिकडे नार वाट पाह्ती ॥ धृ० ॥ राजेंद्र धनी ते छत्रपती आंबारी मध्यें चंद्र शोभती । हिऱ्याचें कंकण झळकती हार पाचूचा ॥ सिरीं मंदिल करीं झग झग तुरा मोत्याचा ॥ जी ॥ माय मोर्तब सिक्का कट्यार । दालिबंद शोभे पांची हत्यार ॥ मुंड्यावर ढाल रुमाल जडित रंगाचा । दस्ताना अंगीं बखतर वर्द सोन्याचा ॥ लावलष्कर फौजेचा थाट । गर्दी स्वारांची मिळेना वाट। त्यामधीं बाणि बोलतो भाट॥ सिक्का मर्दाचा आंबर। सदा जयजयकार । गायकवाडाचा । चाल ॥ संगें चतुरंगदळ । पुण्याई अतिअचळ ॥ अष्ट उमराव युद्धपति सेनापती । नसे श्रीपती निरपती भूपाळ ॥ प्रजेवर कृपाळ । रथ घोडे आणिक पालखी। करनाटकी दिव्य नालखी आणिक संग पायदळ ॥ युद्धासीं असे चपळ । पुढें माधवलिंबाळकर ॥ संग बाहादर पैठणकर खांडवळकर दिवाणासिं गुंजाळ । संग्रामीं नाहीं टळ ॥ पांढरे लोंढे वाकडे । कानिचौकडे लढाऊ खडे घोरपडे फाकडे ॥ अति सबळ पहा करती रण दुंबळ । राहिले सिंधि आरब मक्राणी ॥ रांगडे लोक हिंदुस्थानी हेटकरी लोक माळवी । वाद्यें झाडती ॥ घण तुरूपखानां जरीपटका संगातीं । दक्षण टाकुन गेले गुजराथप्रांतीं ॥ लागले लक्ष पतीकडे नार वाट पाहती ॥१॥

कठिण मराठे लोक कटकै । जिवा जन्माची असे खटक । नसे कांहीं मनामधीं अटक ॥ लढुं लढुं घटले । लोक बदामीस नाहीं पहा हटले ॥ जी ॥ असे गाईकवाडी लोक जबर । नंगी समसेर। बांधुन कंबर ॥ सदा खुन डोळ्यामधीं तंबर । मुलुख नांवान कटले ॥ खुप केली लढाई बीन बडोद्या झटले ॥ जी ॥ घोडनदी

उतरून अलिकडे। चांदबिबीच्या राज्यापुढें॥ मुलुख खान देश गिरासी तिकडे जाऊन गटले। सालेर मुल्हेर केले सरशत्रु लटपटले। चाल॥ धरली वाट सातपुड्यांत झाडी दाट। उंच वृक्ष शमी, देवदार, सुरु, सादार, मानदार, वेळ, दाट॥ कोंडाईबारी घाट। केळीं नारळी कीर॥ तिला पारजातक पक्षी चातक मातला रोखी वाट। रिसासिंहव्याघ्र आचाट ससे जंबुक रानडुकर सांबर टोकर॥ करकुच सिलपट भील कोळ्याची गांठ। गिरासी लोक असे तुडविले॥ झेंडे सोनगडामधीं चढविले। माल नेऊनि तळीत ठेविला ध्वजा उडताती॥ बावजीर टाकुन घाट पुढें पाहताती। स्वामी गेले भरनवती सोडुन॥ तपती नर्मदा पलिकडे नर्मदा उतरून दक्षिण टाकून गेले गुजराथप्रांतीं। लागलें॥ २॥

बडोद्यापलिकडे डाकुर। कठीण मेवाती लोक ठाकुर। हातीं तिरकमठा मोठे चकोर। काठे भीलवाणी घालताती धाडा लुटती वाटमार्गानीं॥ आलें गाईकवाडांचें लष्कर। पळती महिकाठेचि तस्कर। चोपिले शत्रु केले जरजर ज्याह्या मर्दांनीं। घेतला सावळ्या महाल गाईकवाडांनीं॥ झाले प्रसन्न शिवशंकर। आमदाबादेंत आलें लष्कर॥ जाउन त्यांनीं शालु धरिला भर मरदानी। गेली खबर दिली चवथाई श्रीमंतांनीं॥ चाल॥ मोठे मोठे सरदार। असी गाजली तलवार॥ मराठी लोक दक्षणचे कमरी तनाचे। हातीं सेरबचे॥ सचे लढणार। रणशूर रणीं भिडणार॥ विकट तोफांचा मार। बहुत अनिवार। जाहला कहर॥ गोळा वर्षे फार। किती घायाळ किती ठार॥ घेतला मुलूख कठिण। कडीपट्टन करून गटन॥ सनसनसनकार। आंत बाणांचा मार॥ अमरोळीमधें काठेवाड जुनागड। ह्या देशामधीं फौज लढ। घेतिला मुलूख अवघड॥ असे

ह्मणताती । निघाले स्वामी आलें पत्र जासुदाहातीं ॥ दक्षिणी गेले ॥ ३ ॥

स्वामी आले पाहुन शुभ घटका । मुलुख केला सर उडे जरिपटका ॥ गेली खबर दिल्ली अटका । कीर्त गाजे धन्य प्रभु गुजरखंडवाले प्रतापीराजे ॥ पूर्ण धन मल्हाराचे भगत । जिंकिला डाव साधिला वक्त । चहूंकडे शत्रु केले आरक्त डंकावाजे ॥ त्यावर उडे चवरी सिरीं छत्र साजे । संगातीं आले घेऊन दळभार ॥ मराठी लोक मोठे सरदार । सदा हातीचे साची तलवार शत्रु लाजे ॥ आले स्वस्थानीं बडोद्यांत गाइकवाड राजे । चाल ॥ कान्हईचा वनमाळी । आले राकसाचे काळी ॥ सुंदर करी शृंगार । अंगावर जोहार दिसे बेवहार ॥ नार पति ओवाळी । सण आनंदांत दिपवाळी ॥ करून महाल चकचकाट । पहा लखलखाट ॥ तसबिरी दाट । थाट करि राजसबाळी ॥ छंदमोतीची जाळी । पावले तिला ईश्वर ॥ उमामहेश्वर । वाद्यें सुस्वर ॥ गरजताती त्रिकाळीं । झाट बीद डोरी झळाळी ॥ ज्यासि दत्त झाले प्रसन्न । सिताराम फक्कड करी स्मरण ॥ धुंधपडवंदी चरण किसन बापुगाती । कवन करी कोंडाजी सदागुणी जन चहाती । दक्षिणी० ॥ ४ ॥

---

## १० बदामी किल्याचा पोवाडा.

बारावर्षांची उमर आंगीं तारुण्य । जसे रसाळ लिंबावाणी जोबन ॥ कां जातां जिवलगा सख्या मजटाकुन । आत घडिमला कमेंना तुह्मांवांचून ॥ कसे टाकुन जातां कसें कंठू एकली । तुजविणेर राघु मला धुंद भरली ॥ नाहीं लष्करामधें कोठें सोय राहिली । लष्करांत तीन पायल्यांची धारण झाली ॥ कैक सिलेदारांचीं घरें बुडालीं । कैक रात्र आपल्या घरासि-

चालुन आले । मी सांगते तुह्माला चित्त द्या बोला ॥ चाकरी कशाला व्हावी राव तुह्मांला । सुंदरा फार विनविती भ्रताराला ॥ तुह्मीं नकाहो जाऊं यंदा या लष्कराला ॥ १ ॥

साजण ह्मणे नारीला ऐक माझी गोष्ट । नको घालुं ग मजला मोडा लाव वाट ॥ धन्यानें पाठविलें पत्र लिहुन आह्मांस । सिद्धटेकीं जमाव झाला अटोकाट ॥ तूं उगच नारी आमचा घोटाळा केला । ती उठली सुंदर गेली राजमहालाला । पंचामृत भोजन करिती स्वामीराजाला ॥ जेऊन उठली पानांचा विडा घेतला । जरतारी पांघुरणांचा पोषाग केला ॥ जोडीनें गंडा पट्टा नीळ्या घोड्याला । मग नार काय बोलती आपल्या स्वामीला ॥ राव माझी काळजी असूंद्या तुह्मांला । सहा महिन्यां परतुनसिनी येऊं घराला ॥ जाऊन मिळाला कृष्णेच्या पाण्याला । जातांजातां ओळखिला त्यानें बदामी किल्ला ॥ बदामी पाहुन हर्ष झाला । इतक्यांत घेईन ह्मणतो हैदराला ॥ सुंदरा विनविती भ्रताराला । तुह्मीं नकाहो जाऊं यंदा० ॥ २ ॥

त्या बदामीच्या मैदानीं बाराभाई । त्यांनीं बसुन मनसुब केला शकल शाई ॥ कौलांत इंदर नाहला येत नाहीं ॥ झुंजायाचा नेम मांडला त्याठायीं । त्यानीं झुंजायाचा केला कीं मजकुर ॥ सुरू तोफा केल्या रात्र होती फार । कौलांत अझून येत नाहिं किल्लेदार ॥ कोणी निशाण नेऊन लावा बुरजावर । त्याला इनाम देऊं एक हजार ॥ दिला शिपायानें ढाली मुंड्यावर । फार दिवस खाल्ला बसुन धन्याचा शेर ॥ जसें रामस्वामीनें घेतलें लंकापुर । तसाच हल्ला झाला बदामीवर ॥ त्या बदामीवरतीं माणुस मेलं फार । धरत्री लाल झाली रक्ताचे वाहिले पुर ॥ कैक ह्मणे माझी नली जन्माची भाकर । सुंदरा फार विनविती भ्रताराला । तुह्मीं नकाहो जाऊं यंदा लष्कराला ॥ ३ ॥

हैदरानें घातला छापा काळे रात्रीं ॥ तिळमात्र ठाऊक नव्हता ह्या लोकांसी । जर येता छापा मजला ठाऊक असतां ॥ पाठवतों फौज छबीना नाक्यावरता । हैदरानें अवचित कसा घातला घाला ॥ मग वेढा पडला साऱ्या लष्कराला । भोंवतालीं डोंगर नाहीं वाट जायाला ॥ बारीच्या तोंडीं एकच रगडा झाला । भावानें सोडला भाऊ त्या वेळेला ॥ मग कोणी पुसेना हंडयान भांडयाला । मग कोणी पुसेना भाल्या बंदुकीला ॥ कैकानीं खुर्दा लातेनें हांतीला । धन्यानें पछेदी केली कोण कोण मेला । दलपतराव पडले खबर कळली त्याला ॥ विनीची चाकरी आली राव होती त्याला । लिहुन पत्रिका पाठविल्या देशाला ॥ दरकुच दरमजली जासुद गेला । चिरेबंद वाडा कमानी दरवाजा देखिला ॥ चंदनाचे पाट कामिना बसाया देई । लष्करची बातमी सांगा जासुदभाई ॥ साहा महिने झाले अजुन संदेशा नाहीं। जासुद काय गडे बोलाल ऐकबाई ॥ सुंदरा फार विनविती भ्रताराला । तुह्मीं नकाहो जाऊं त्या लष्कराला ॥ ४ ॥

पहिली लढाई झाली सुष्टीवरी । दुसरी लढाई झाली बदामीवरी। त्या लढाईत पडले तुमचे प्राणपती । हाय हाय करी सुंदरा प्राण टाकिती ॥ धरणीवर लोळती केस तोडती । मी आतां राहिना कधीं निघते सती ॥ सतीचें सामायन करा ह्मणती । त्या नगरामधीं धोंडी सवाजी जागाती ॥ त्रिंबुरामाजीची आनवा जोडी सुर्ती । त्या दखण देशामधें कलगी निशाण ॥ त्या तुरेवाल्याचे कापा नाककान । सुंदरा विनविती भ्रताराला ॥ तुह्मीं नका० ॥ ५ ॥

---

## ११ खड्याचे लढाईचा पवाडा.

दगडु चेंडु गोंधळी धार मोंगलावर दिल्या ढाला पुण्याबाहेर

मोंगलाच्या येती खबरा शिपाई रणशूर ॥ बंडे झुंजार ॥ दारू-गोळ्याचें साहित्य केलें हैद्राबादेवर पलटण सारे । तिनलाख घोडा घेऊन जाईन पुण्यावर ॥ जाईन सारा कापिन गायी करिन कंदोरि सेकसला मोहर । दखनचे राज करिन सारें मोंगलावर दिल्या ढाला पुण्याबाहेर ॥ १ ॥

श्रीमंत महाराज मनसुब ओका नानाचा । शहाणपणाचा ॥ शाहाणव कुळिचे राजे मिळविन मोड करिन याचा । मोंग-लाचा । तिनलाख घोडा आहे मांधव सिपाई याचा । प्रताप त्याचा । हिंदुस्थानी पत्र पाठविन जिव दादा आमचा संगत बाधर पलटणाचा ॥ हिंदुस्थानी पत्र पत्र गेलें या तुम्ही लवकर । धरा बेदाचा सुमार ॥ या मोंगलावर दिल्या ढाला पुण्याबा-हेर ॥ २ ॥

वाजति चौघडा आरब कडकडति भोजखंडा । पुढें आलें झुंजाचें तोंड ॥ जिवबा दादा भले शूर मर्द ओक यांचि मात। आला घाडग्याचे दणके देत ॥ भोसल्या राजाचे बाण चालले कोकत । पडला रणांत आकांत ॥ गोळ्यामागें गोळा लागला । हातपाय आरडत शिपायाच्या कठड्या काढून जात उजव्या बाजुला तुकोजी गवळी ते जाले मोहर बाराभाई करित तर-वार । मोंगल्या दिल्या ढाला पुण्याबाहेर ॥ बुधवारचे दिसीं ज्यानें मोंगल मोडला । जेरून जेरून खरड्यामधीं कोंडला । तिस लाख रुपये मोंगल खंडणि कबुल झाला ॥ रातचा मों-गल पळून गेला कहे अल्ला कैसी हुई बात । कायकु लष्कर गजबजत ॥ ऐकरे शाहिरं तुझी कलगी आहे थोर दरदाशा मनामधीं झुरें । मोंगलावर दिल्या ढाला पुण्याबाहेर ॥

झगताती । निघाले स्वामी आलें पत्र जासुदाहातीं ॥ दक्षिणी गेले ॥ ३ ॥

स्वामी आले पाहुन शुभ घटका । मुलुख केला सर उडे जरिपटका ॥ गेली खबर दिल्ली अटका । कीर्त गाजे धन्य प्रभु गुजरखंडवाले प्रतापीराजे ॥ पूर्ण धन मदहाराचे भगत्त । जिंकिला डाव साधिला वक्त । चहूंकडे शत्रु केले आरक्त डंकावाजे ॥ त्यावर उडे चवरी सिरीं छत्र साजे । संगातीं आले घेऊन दळभार ॥ मराठी लोक मोठे सरदार । सदा हातीचे साची तलवार शत्रु लाजे ॥ आले स्वस्थानीं वडोद्यांत गाइकवाड राजे । चाल ॥ कान्हईचा वनमाळी । आले राकसाचे काळी ॥ सुंदर करी शृंगार । अंगावर जोहार दिसे बेबहार ॥ नार पति ओवाळी । सण आनंदांत दिपवाळी ॥ करून महाल चकाचकाट । पहा लखलखाट ॥ तसबिरी दाट । थाट करि राजसबाळी ॥ छंदमोतीची जाळी । पावले तिला ईश्वर ॥ उमामहेश्वर । वाद्यें सुस्वर ॥ गरजताती त्रिकाळीं । झाट वीद डोरी झळाळी ॥ ज्यासि दत्त झाले प्रसन्न । सिताराम फक्कड करी स्मरण ॥ भुंधपडवंदी चरण किसन बापुगाती । कवन करी कोंडाजी सदागुणी जन चहाती । दक्षिणी० ॥ ४ ॥

---

## १० बदामी किल्याचा पोवाडा.

बारावर्षांची उमर अंगीं तारुण्य । जसे रसाळ लिंबावाणी जोबन ॥ कां जातां जिवलगा सख्या मजटाकुन । आत घडिमला कर्मेना तुह्मांवांचून ॥ कसे टाकुन जातां कसें कंठू एकली । तुजविणरे राघु मला धुंद भरली ॥ नाहीं लष्करामधें कोठें सोय राहिली । लष्करांत तीन पायल्यांची धारण झाली ॥ कैक सिलेदारांचीं घरें बुडालीं । कैक राव आपल्या घरासिं-

चालुन आले । मी सांगते तुह्माला चित्त द्या बोला ॥ चाकरी कशाला व्हावी राव तुह्मांला । सुंदरा फार विनविती भ्रताराला ॥ तुह्मीं नकाहो जाऊं यंदा या लष्कराला ॥ १ ॥

साजण ह्मणे नारीला ऐक माझी गोष्ट । नको घालुं ग मजला मोडा लाव वाट ॥ धन्यानें पाठविलें पत्र लिहुन आह्मांस । सिध्दटेकीं जमाव झाला अटोकाट ॥ तूं उगच नारी आमचा घोटाळा केला । ती उठली सुंदर गेली राजमहालाला । पंचामृत भोजन करितो स्वामीराजाला ॥ जेऊन उठली पानांचा विडा घेतला । जरतारी पांघुरणांचा पोषाग केला ॥ जोडीनें गंडा पट्टा नीळ्या घोड्याला । मग नार काय बोलती आपल्या स्वामीला ॥ राव माझी काळजी असूंद्या तुह्मांला । सहा महिन्यां परतुनसिनी येऊं घराला ॥ जाऊन मिळाला कृष्णेच्या पाण्याला । जातांजातां ओळखिला त्यानें बदामी किल्ला ॥ बदामी पाहुन हर्ष झाला । इतक्यांत घेईन ह्मणतो हैदराला ॥ सुंदरा विनविती भ्रताराला । तुह्मीं नकाहो जाऊं यंदा० ॥ २ ॥

त्या बदामीच्या मैदानीं बाराभाई । त्यांनीं बसुन मनसुबकेला शकल शाई ॥ कौलांत इंदर नाहला येत नाहीं ॥ झुंजायाचा नेम मांडला त्याठायीं । त्यानीं झुंजायाचा केला कीं मजकुर ॥ सुरू तोफा केल्या रात्र होती फार । कौलांत अझून येत नाहीं किल्लेदार ॥ कोणी निशाण नेऊन लावा बुरजावर । त्याला इनाम देऊं एक हजार ॥ दिला शिपायानें ढाली मुंड्यावर । फार दिवस खाल्ला बसुन धन्याचा शेर ॥ जसें रामस्वामीनें घेतलें लंकापुर । तसाच हल्ला झाला बदामीवर ॥ त्या बदामीवरतीं माणुस मेलं फार । धरत्री लाल झाली रक्ताचे वाहिले पुर ॥ कैक ह्मणे माझी नेली जन्माची भाकर । सुंदरा फार विनविती भ्रताराला । तुह्मीं नकाहो जाऊं यंदा लष्कराला ॥ ३ ॥

हैदरानें घातला छापा काळे रात्रीं ॥ तिळमात्र ठाऊक नव्हता ह्या लोकांसी । जर येता छापा मजला ठाऊक असतां ॥ पाठवतों फौज छबीना नाक्यावरता । हैदरानें अवचित कसा घातला घाला ॥ मग वेढा पडला साऱ्या लष्कराला । भोंवतालीं डोंगर नाहीं वाट जायाला ॥ बारीच्या तोंडीं एकच रगडा झाला । भावानें सोडला भाऊ त्या वेळेला ॥ मग कोणी पुसेना हंडयान भांडयाला । मग कोणी पुसेना भाल्या बंदुकीला ॥ कैकानीं खुर्दा लातेनें हांतीला । धन्यानें पछंदी केली कोण कोण मेला । दलपतराव पडले खबर कळली त्याला ॥ बिनीची चाकरी आली राव होती त्याला । लिहुन पत्रिका पाठविल्या देशाला ॥ दरकुच दरमजली जासुद गेला । चिरेबंद वाडा कमानी दरवाजा देखिला ॥ चंदनाचे पाट कामिना बसाया देई । लष्करची बातमी सांगा जासुदभाई ॥ साहा महिने झाले अझुन संदेशा नाहीं। जासुद काय गडे बोलाल ऐकबाई ॥ सुंदरा फार विनविती भ्रताराला । तुह्मीं नकाहो जाऊं त्या लष्कराला ॥ ४ ॥

पहिली लढाई झाली सृष्टीवरी । दुसरी लढाई झाली बदामीवरी। त्या लढाईत पडले तुमचे प्राणपती । हाय हाय करी सुंदरा प्राण टाकिती ॥ धरणीवर लोळती केस तोडती । मी आतां राहिना कधीं निघते सती ॥ सतीचें सामायन करा ह्मणती । त्या नगरामधीं धोंडी सबाजी जागाती ॥ विठुरांमाजीची आनबा जोडी सुर्ति । त्या दखण देशामधें कलगी निशाण ॥ त्या तुरेवाल्याचे कापा नाककान । सुंदरा विनविती भ्रताराला ॥ तुह्मीं नका० ॥ ५ ॥

---

## ११ खड्यांचे लढाईचा पवाडा.

दगडु चेंडु गोंधळी धार मोंगलावर दिल्या ढाला पुण्याबाहेर

गलाच्या येती खबरा शिपाई रणशूर ॥ बंडे झुंजार ॥ दारू गोळ्यांचें साहित्य केलें हैद्राबादेवर पलटण सारें । तिनलाख घोडा घेऊन जाईन पुण्यावर ॥ जाईन सारा कापिन गायी करिन कंदोरि सेकसला मोहर । दखनचें राज करिन सारें मोंगलावर दिल्या ढाला पुण्याबाहेर ॥ १ ॥

श्रीमंत महाराज मनसुब ओका नानाचा । शहाणपणाचा ॥ शाहाणव कुळिचे राजे मिळविन मोड करिन याचा । मोंगलाचा । तिनलाख घोडा आहे मांधव सिपाई याचा । प्रताप त्याचा । हिंदुस्थानी पत्र पाठविन जिव दादा आमचा संगत बाधर पलटणाचा ॥ हिंदुस्थानी पत्र पत्र गेलें या तुम्ही लवकर । धरा वेदाचा सुमार ॥ या मोंगलावर दिल्या ढाला पुण्याबाहेर ॥ २ ॥

वाजति चौघडा आरब कडकडति भोजखंडा । पुढें आलें झुंजाचें तोंड ॥ जिवबा दादा भले शूर मर्द ओक यांचि मात। आला घाडग्याचे दणके देत ॥ भोसल्या राजाचे बाण चालले कोकत । पडला रणांत आकांत ॥ गोळ्यामागें गोळा लागला । हातपाय आरडत शिपायाच्या कठड्या काढून जात उजव्या बाजुला तुकोजी गवळी ते जाले मोहर बाराभाई करिते तरवार । मोंगल्या दिल्या ढाला पुण्याबाहेर ॥ बुधवारचे दिसीं ज्यानें मोंगल मोडला । जेरून जेरून खरड्यामधीं कोंडला । तिस लाख रुपये मोंगल खंडणि कबुल झाला ॥ रातचा मोंगल पळून गेला कहे अल्ला कैसी हुई बात । कायकु लष्कर गजबजत ॥ एकरे शाहिरें तुझी कलगी आहे थोर दरदाशा मनामधीं झुरें । मोगलावर दिल्या ढाला पुण्याबाहेर ॥

## १२ पानपतचे लढाईचा पवाडा.

सिद्धेश्वर घेऊन दळभार। चालुन गेले हस्तनापूर। है पठाणका लष्कर जमुनाके पार ॥ ध्रुं० ॥

सदोबा हस्तनापुर पावले। सुभेदार होळकर बोलले॥ दिल्ली-मध्यें सतवूं नका कोणाला हें हस्तनापुर आहे पांडवाचें। दिल्ली-मधें तक्त बादशहाचें॥ या मोंगलास देणें झालें होतें राव भग-वंताचें। यागोष्टीमधें बळ नाहीं कोणाचें। सदोबा ह्मणे ऐकेना तुमचें॥ तक्त मोडून घेईन जोहार। है पठाण का लष्कर ज-मुनाके पार॥ सिद्धेश्वर घेऊन दळभार० ॥ १ ॥

भाऊसाहेब दिल्लींतून निघाले। पूर्वदिशेला डेरे दिले॥ ज-रिचें निशाण सोडून दिलें। भाऊच्या संगतीचें उमराव॥ वि-ठ्ठल शिवदेव आणिक माणकेश्वर। दमाजी गायकवाड नारो-शंकर॥ विश्वासराव नानाचे कुमर॥ है पठाणका लष्कर०॥ २॥

सुनोजी पठाणानें खबर। दिल्लीपर आया सिद्धेश्वर॥ आये सब दखनके सरदार। चौमासा शिरपर नदीयापुर॥ ठावक-रता गये जमनाके पार। जलती दिल्ली नहि कुच आपना जोर॥ जा गनिमसे लढूंगा एक बहार। मुलुख जानेका अर्जीकर॥ तुजकु पाया सुना घर। है पठाणका० ॥ ३ ॥

तक्त मोडिलें शुक्रवारीं। थरथर कापती धरत्री॥ अवघी दिल्ली रोजना करी। उमास्थळीं बुडाले तक्ताचे छत्रधारी॥ असे कोपले श्रीहरी हस्तनापुरीं। सुरजमल्ल पडदळाला भारी॥ निघाले होळकर केली स्वारी। सुभेदार ह्मणे गोष्ट नाहीं बरी॥ भाऊसाहेब दूरवर विचार। है पठाणका० ॥ ४ ॥

सुनोजी पठाणनें खबर भला हुवा तोडा तक्त। नर्मदापार सु-नजा वात॥ ऱ्हासे मुलुख दिया तुजकु तेरे हात। बैठा मो-जाकर बजावता नौवत॥ नहि मानता वात होजा लढनेको

शाबुत । काळ फिरता है तेरे सात ॥ भस मोतका बजार । है पठाणका० ॥ ५ ॥

भाऊसाहेबानें खत ऐकलें । खत ऐकुनया क्रोधें भरले ॥ कागद लिहा एक गिलचाला । नवा क्रोडास टाकिला धडा ॥ दिल्ली अटकेपासून अवघा मुलुख सोडा । भाऊ ह्मणे वल्ली तीस हजार घोडा । तुटेल तुमचा आमचा येथून झगडा ॥ हस्तनापुरास हात जोडा । लवकर पाठव तूं उत्तर ॥ है पठाणका० ॥ ६ ॥

सिंदेसिंग गलिमका खत आया । पठाणनें दरबार भरवाया ॥ सपतेसमान खत पढवाया । कोई कहो यारोरे इसबातको सल्ला । सबपठाण निकले कहे उसेदे अल्ला । उतरेंदे जमुना फेर करूंगा हल्ला ॥ भरभर ढाला देऊं मोहरा । भाऊसाहेब दूरवर विचार ॥ है पठाणका० ॥ ७ ॥

गिलचा पठाणका मनसुबा बडा । हुवा जमुनाका पाणी थोडा ॥ उतरा चाळीस हजार घोडा । सदोबाके लष्करके रस्तघेरी ॥ बिकनगये रुपयेके दिडशेर ज्वारी । भुकेसे हत्ती मरगये हुई लष्करकी खोरी ॥ कहे पठाण झुंजारी सोनपत पानपत उपर । है पठाणका० ॥ ८ ॥

सुने संरखी तील संक्रांती पठाणके सत्यशाहीत । उनका नुक्ता उनका हात ॥ गये अरोबा पठाण हो गये धीट । विश्वासरावकु गोली लगी हुये चटपट ॥ बंद लष्करका गया फुट । व्हागई सदोबाकी नजर ॥ है पठाणका० ॥ ९ ॥

---

## १३ धारेच्या किल्ल्यांत बंड झाल्याचा पवाडा. आनंदराव पवार यांचे कारकीर्दीतील.

विलायती मक्राणी पठाण आरब पेंढारी मुसलमान । चारी पांच जातीचे मिळून करिती मजकुर ॥ साळी माळी झाले शिपाई । भाड भडवुंजे सोडून देई । असी मिळून साऱ्यांनीं उभी केली बादशाही । वस्तीमधीं मातले तस्कर । रयत कापती थरथरा । ज्याचा माल घेई तयाला मारती माघार ॥ तुझी फिर्याद लागेल तूं जा तेथवर । फिर्याद न्यावी कोणाजवळ वस्तीला नाहीं कोणी सरदार ॥ भीत गरिबबिचारे बसले घरोघर । कसा कहर वर्षला ऐका धारावर ॥ त्याला भीती सेटसावकार । मानकरी एक येईना समोर ॥ कसे लांडे मातले ऐका मुसलमान । मी तर गातो पवाडा खरा हे तर महशूर अवघ्याला ॥ किल्ल्यांतून अवघा बंड निघून गेला । त्या मागें आंग्रेजानें किल्ला सर केला ॥ १ ॥

जमाव जमला आटोकाट । वीलायती-मक्रण्याचा थाट । ते नीशाण घेऊन हिंडे गांवांत । आह्मी उभे केली बादशाही सांग लोकांत । गुलख जमादार बोलला सांगतो वीलायती मक्रण्यांत चला जाऊं भोपाराला सल्ला केला ॥ त्या दिवशीं रात्रीं गेले भोपाराला । दिवस पहांटेचा अमल झाला ॥ हल्ला भोपारावर केला । भील पलणीचे लोक तमाम पळून केला ॥ मक्राणी वीलायती तोफा घेऊन आली । मारली भोपाराची लढाई ॥ तेव्हां निघाले बाराभाई । कोणी उडद्या लुटल्या कोणी बासनें घेई ॥ अमझिऱ्यास येऊन तेव्हां रात्रीं राही । अमझेऱ्याचा राजा भ्याला ॥ मेजवान्या देतो वीलायेत्याला । तो गुल्खा जमादार तेथून निघाला ॥ भोपार लुटलें सांगतो बाईला । जीजीबा-

ईचा हुकूम आला ॥ बोलवा गुलखा जमादाराला । दे गादी माझ्या भाच्याला सांगतें तुला ॥ गुलखा जमादार बोलला गादी नाहीं मिळत भांच्याला । बाळासहिब सरदार भला गादीवाला ॥ बाळासाहेब मूर्त सुंदर बसले होते गादीवर । मनांत झाले दिलगीर करी विचार ॥ हरी कसा ईश्वर । कोपला मजवर ॥ बाबासाहेब दीवाण जुना सांगतो अवघ्या लोकांला । कसा उलटांआला जमाना अरे भगवंता ॥ त्या गायीला वासरांची पडली चिंता मी तर गातो पवाडा खरा ॥ २ ॥

मुसलमान होते गांजा पीणार । त्यांना दीली होती सलीपभर। चलाजाऊं मोरचावर एक टक्कर । साहेबानें डागला गोळा त्यांच्यावर॥ मुसलमान जाहले बेजार । आणि पळून आले घरोघर । आयाबाया नांव ठेवीती भले रणशूर ॥ दाढयामिशा मुंडवून बसले घरोघर । आकरा रोज लढाई फार गोळा चालला किल्लयावर ॥ साहेब झाला बेजार धीरनाधीर । तसीच हल्ला झाली पेंढाऱ्यावर ॥ पेंढारी मारले राव फार लुटली धार । केली सर इंग्रेज बुद्धीचे घर करून फीतूर । त्यानें तोफा लावल्या नेऊन दरवाज्या मोहर ॥ बंदी छोड सत्याचा पीर त्याला मदत त्यांची फार । बाळबच्चे सुद्धां बंड बाहेर काढून तेव्हां मिळाले । बारा भाई धाराची केली होती रावशाही । राघोबादादा होई धार वाचवी ॥ आंग्रेजाला समजून वाटे लावी । वीठोबा गातो सेवक भला त्याणें पवाडा रचला । हर सटवा रामारंगेला गातो सभेला ॥ त्याणें रंग उडविला पहा त्यां मजलसशीला ॥४ ॥

---

## १४ पोंवाडा—श्रीमंत यशवंतरावमहाराजाका.

सवाई यशवंतराव बहादूर सवाई झंडा लगाया । मंदोसरसे मारा फिरंगी जा जमुनाके पार किया ॥ कूच किया मंदोस-

रसे सवारी चली महाराजकी, चमला नदी आगई छाती, फटी फिरंगीकी। मकुंदरेका पकडा जो रस्ता, भागी फौजा फिरंगीकी ॥ उजाड खेडा था एक नाला, रंजबिन गोरे परखाकी ॥ चौमासेका दीन यारों घट्टा बादल छाया । चंमाचम बिजली चमके फिरंगीका होस गया। होस गया भाई होस गया ॥१॥

पाटगीं छोडी रस्ता पकडा, रात दिन भागता। आगे फिरंगी पीछे सवारी, महाराजाओ चला आता ॥ रस्ते म्य.ने कीच मचाई सिरपर मेऊ बरसता। रामपुरेको दिया छोडके । नही काम वहा रहनेका ॥ चार घड़ी मुक्काम किया । कोई खाया कोई रहा भूका ॥ बड़ी सबेरे ऊठ बजाये तंबूर, रस्ता लिया बनारसका । महाराजकी धैशत खाकर, बनारस जा पास रहा ॥ चढी पलटण रजबिन गोरे मोरेसे मोरा भिडा । मोरा भिडा भाई मोरा भिडा ॥ २ ॥

मकुंदरसे भागा फिरंगी, जालमसिंगसे आन मिला। किसी तरेसे बचाव हमको, महाराज रोंका गला ॥ जालमसिंग कहे सुनो फिरंगी, तुमने कुछ नही किया भला। इस नदीकू नही उतरा, अथंग जाती है चमला ॥ हाती ऊपर लगे उतारे, जैसा वैसा पार हुवा ॥ कंईएक डुब गये कंईएक बय गये तोफखाना सबी रहा। सबी रहा भाई, सबी रहा ॥ ३ ॥

महाराजको खबरा पोंची, बनारस फिरंगी पडा । महाराजकी भई तयारी महाराज रणसूर बडा ॥ बढा जो कंपू दिया अगाडी मोरेसे मोरा भिडा। चार तरफसे चलरही तोफा, गुब्बारेका मार बडा ॥ महाराजनें किया जो हल्ला, जैां बकरोंमें नहार पडा। गपा गप जब भई लढाई, फिरंगीका सिर फोडा॥

---

१ रेजिमेंट. २ पाऊस. ३ गळा दाबला. ४ " अजब नदी है चमला " असाही पाठ आहे.

ऐली पारका गर्द किया । पैली पारका भाग गया, आगये महाराज पडगई धैशत कलकत्ताथर्राय रया ॥ थर्राय रया भाई घबराय रया ॥ ४ ॥

लीक साहेबनें लिखके भेजा जाना है कलकत्तेकू । हलकोरेनें बताई चिठ्ठी मिले आलम सब देखनकू ॥ सबी कंपनी मिलकर यारों लगे बाचने चिठ्ठीकू । बनारसपे मारा फिरंगी नही ठिकाना रहेनेकू ॥ लीक साहेबनें बयान किया लगी कंपनी थर्रानेकू । महाराजके सवाई झिंडें उडे मथुरा विंद्रावनकूं । आया मीरखां नबाब बहादुर सबी पिंढारा साथ लिया ॥ सहेर फरक्काबाद, कानपूर कलकत्ता जब फूक दिया । फूक दिया भाई उडा दिया ॥ ५ ॥

फरासीसका गुलाम आगे जब फिरंगी बनके आया । जोहारा फरक्काबाद ऊपर महाराजकू दगा किया ॥ उस राजानें किरत बढाई महाराजसे मिल रहा । घीशाकरकी दी मिर्जवानी तमाम लष्कर खूष किया ॥ महाराजकू कपडे देकर वडा उनें उल्हास किया । राजा फिरंगी दोनों मिलके पिछले पहेरे छापा लाया ॥ घनाघन जो गोले मारे सदा जंजीरी बरस रहा । महाराज यशवंतरावनें वहांभी भाला सही किया ॥ सई किया भाई घुसड दिया ॥ ६ ॥

फिरंगीनें टोपी उडाके उस राजासे क्या कहा । बहोत तरासे लगाये हुन्नर महाराजनें हटा दिया ॥ आया हैदराबाद चढकर नवाबको कायल किया । कर्नाटकमें बजाय तंबूर सुरपट्टूका ठाना लिया ॥ सिंदेपर जद मार लढाई झिंडा आसेरपर दिया । नागपुरपर भई लढाई गायलगडका किल्ला लिया ॥

---

१ मारले. २ हझार लोक. ३ थरथर कांपूं लागली. ४ अशीरगडचा किल्ला.

फिरंगी अपने दिलमें कहेता महाराजने खूष किया । चारो खूटमें होगयी नकशा मार फिरंगी हटा दिया ॥ हटा दिया भाई भगा दिया ॥ ७ ॥

भरतपूरपें आया फिरंगी किल्ला दीगका लिया । दगाबाज काफर फिरंगी जाय कम्बलसे घूसरहा ॥ एक हजार गोरेकी पलटण गोरे भरतपुर लेआया । सवा पहेरमें लेऊं भरतपूर दिलम्याने मगरूर किया ॥ भरतपूर लगे मोरचे जाटोंने बंदोबस्त किया । महाराजकी खडी अस्वारी चंद्रसुरज जों. खूलरहा ॥ रातदीन जो होती लढाई अस्वार पैदल भिडा-रहा ॥ संगीन बंदुक ढाल तलवार गोलेका मेऊ बरस रहा । बरस रहा भाई बरस रहा ॥ ८ ॥

तीन पहर और चार घडी हल्ला मारा फिरंगीने । जा कि-ल्लेसे चिपटे गोरे लगे जंजीरे बाजनें । फते बुरजपें चढगया फिरंगी लगे तंबूर बाजनें ॥ महाराज थे फुलबाडीमें खबरा की उन ज्वानोंने । फुलवाडीसे चली सवारी आया फिरंगी सामने ॥ फिरंगीका मोरा तोडा हल्ला मारा जाहोंने । उस हल्लेमें मरगया गोरा रंज फौजमें भररया ॥ लीक साहेबनें छाती पीटी कलकत्ता खाली हुवा । खालीहुवा भाइ खालीहुवा९

भरतपूरमें मार लढाई महाराजनें चल दिया । हिंदुस्थान पंजाब छोडके लाहोरका मैदान लिया ॥ लाहोरवाला रणजीत राजा साथ फौज दोलाग्व लिया । महाराजकूं मिलने खातर अमृतसरपर चला आया ॥ जद दोनोंका मिलाफ हुवा ॥ तब फिरंगी घबराया । यहां लढनेका नही ठिकाना कलकत्ता लंबा रहा ॥ फिरंगीने वकील भेजके महाराजकू समझाया । हमने हारा तुमनें जीता जो हुवा सो भला हुवा । सवाई खंडेराव परसन्न महाराजपें है छाया ॥ हरी बाळानें गाई लढाई तमाम लस्कर

खुष किया । पोषाक दिया उस्ताद हुवा ॥ उस्ताद हुवाभाई उस्ताद हुवा ॥ १० ॥

---

## १५. पंवाडा हरीराव महाराजाचा.[1]

हरीराव महाराज, गरिब जीवाज, केले आंदाज, करून दीली दखल । उमामहेश्वर पुण्य प्रतापी अट्टल दिल्ही अक्कल ॥ शहर गादि इंदूर, नांव दुरदूर, द्रव्य भरपूर, पाहुन मन झुकल । मोठ मोठे साहुकार, अमीर उमराव, पाहुनी मन झुकल ॥ होळकरशाईवर दस्त, करील जो कस्त, लुटुन होईल फस्त, जिवाला मुकल । पहिल्या पासुनी आले होत या मध्यें कधीं न चुकल ॥ महालाची वर्णू शोभा, अती मजबुत बारद्वारी । मेहरापी सुगड खामोखामीं चौगीर्द लैच हुशियारी ॥ खाशाची छबतब बिंबा चौथ्या मजल्यावर स्वारी । कचेरीचा थटथाट, बने भले लोक दाट, मीळेना वाट, बादली चीरे ॥ हारीराव होळकर, महाराज समसेर, बहाद्दर पुरे । धन्यह्माळसाकांत, मोठे श्रीमंत, आजपर्यंत, मदतगीर पुरे ॥ हरीराव० ॥ १ ॥

(अपुरा आहे.)

---

## १६. पवाडा तुकोजी महाराज होळकराचा.

महाराज तुकोजीराव होळकर आलें दक्षिण देशी । शालीवाहन सतराच्या शकीं पंच्याण्णव वर्षी ॥ कुटुंबसहपरीवारीं उभयता पुत्रराज बनसी ॥ वडील शिवाजीराव[2] धाकटे यशवंत

---

१ हरीराव होळकराच्या पोवाडयाचा जास्ती भाग सध्यां मिळत नाहीं. २ हल्लींचे श्रीमंत शिवाजीराव महाराज होळकर.

होशी । असुन लहान वय ज्ञानगुणाचे सागर गुणराशी ॥ जन्मांतरीच्या आले योगानें होळकरवंशीं (मिळवणी०) अहो यात्राकरतां निघाली स्वारी आनंदानें ॥ योग्य ठिकाणीं व्यय द्रव्याचा केलीं अन्नदानें । राजधानीची जागा इंदुर माळव्यांत राहणें ॥ होळकराची गादी सलामत शंकराचें देणें ॥ १ ॥

महाराजाचे बंधु काशीराव[1] दादा गुणग्राही । कोठी शागर्पेशा[2] कारखान्याचें काम पाही ॥ पाराजी[3] होळकर धाकटे लगे भाई । मानकऱ्यांमधीं दिली असामी पाहुन चतुराई ॥ एकया उदरीं जन्म तिघांचा एकाचिच ह्माही । संचित नाहीं कसें ह्मणावें पूर्वीचें कांहीं ।(मीळवणी०) । महाराज गादीचे मालक झाले दत्तविधानानें । बिना सुकृतावांचुन नाहीं राज्य प्राप्त होणें ॥ २ ॥

सरटी माधवराव नवीन केले कारभारी । यांनीं इंग्रजी रवाब चालू केला दरबारी ॥ महाराज तुकोजीराव बहादुर पुरुष अवतारी । केली आकर्षण शक्ती गाजउन अमल सरकारी ॥ अण्णा[4] साहेब गरुड रावजी[5] गोरे सुविचारी । आपआपल्या कामीं होते सर्वच अधिकारी ॥ केले प्रयत्न महाराजानीं षष्ठि मुहूर्तानें । दिली कुच्याची नोबत डंके वाजती कर्णे ॥ राजधानीची जागा इंदुर माळव्यांत राहणें ॥ ३ ॥

दरकदार मानकरी मुत्सदी आयका । दिवाण पळशीकर[6] अण्णा साहेब ठाउक लोकां ॥ रावजीपंत बाबाच्या घराणें फडनीस नोका । बळवंतराव[7] मल्हार बरोबर नव्हते ह्मणावें कां ॥ मुनीम त्याचा पारनेरकर गणपतराव बाका । त्यानें आपल्या नांवें शाहीत

---

१ सर काशीराव दादा साहेब हयात आहेत. २ शागीर्दपेषा कारखाना व कोठी कारखाना. ३ पाराजीराव हयात आहेत. ४ वामनराव रामचंद्र गरूड. ५ रावजी काशीनाथ गोरे. ६ रामराव नारायण पळशीकर ७ हयात आहेत.

वाजविला डंका ।(मीळवणी०)। असे बरोबर लोक होते निवडक जे शहाणे । त्यांचीं नांवें आयकून घ्यावीं खालीं मिसल पहाणें ॥ राजधानीची जागा इंदुर माळव्यांत राहणें ॥ ४ ॥

सखाराम गोपाळ मुनीम हे होते चिटणिसाचे । पागनिस शिकनीस मालक नव्हते कोणी घरचे ॥ रामकृष्ण सबनीस चिरंजीव बहिरोपंताचे । दरबारामधिं काम करावें पानसुपारीचें ॥ बाबाजी मोहनीराज दिवाण हो नविन खाजगीचे । दाजीसाहेब सुभे नेमले इंदूर जिल्ह्याचे ॥ दरबार मंडळी निघाली मोठ्या थाटानें । पुण्याहुन जेजुरीस स्वारी गेली दिव्याच्या घाटानें ॥ राजधानीची जागा इंदुर. ॥ ५ ॥

आडनांव बुळें सरदार दुसरें जावायाचें नातें । जावऱ्याचे नबाब आपल्या संस्थानिं होते ॥ तसे टोंकचे नबाब त्यांचे पतक आलक सौते । नरसिंगगडचे राजे चैनसिंग तेही आले नव्हते ॥ देवळ प्रतापगडचे दुसरें पाटनगीर यानें कंठीं जंठीकडे रवाना पैसाचें पोतें । असे मुख्य सरदार लिहिले मतिनें ॥ कारण वृत्तें त्याचे बरोबर म्हणून जाहलें राहणें । राजधानी० ॥ ६ ॥

बापूसाहेब कंदमबांडे मानकरी पहिले ॥ त्यांच्या घराण्यापासून होळकर पदवीला चढले । मल्हारराव महाराज नंदुरबार इथें गेले ॥ रावकंठाजी कदमापाशीं नोकरीस राहिलें । तापी नदीच्या कांठिं पेशवे कदम जेव्हां भिडले ॥ कलागतीचें महाराजानीं निवारण केलें (मिळवणी०) चतुरपणाची तारीफ आयकुन बाजीरावानें ॥ कंदमापासुन मागुन घेतले मल्हारराव शहाणे ॥ ७ ॥

बांडे याची मूळ हकीगत आलि संदर्भाला । म्हणून घेतलें संक्षेपानें काव्य बांधण्याला ॥ निर्भयसिंगठाकुर भागवत बाबा

स्वारीला । आणिक लहान मोठे होते मिसलीला ॥ अशा समारंभानें निघाली स्वारी जेजुरीला । कडीपठारावरतीं मल्हारीच्या दर्शनाला ॥ (मिळवणी०)॥ परोपरी सजऊन सांडणीवर जंबूरखाने । हालकारे चपरासी बरोबर होते कारखाने ॥ राजधानी० ॥ ८ ॥

गोविंदराव खुटाल परम हे विश्वासुक घरचे ॥ जानोजी महाराजानीं दिलें तें काम खजीन्याचें ॥ भवानीसिंग सरनौबत अफीसर केले पागेचे । स्वारी बरोबर नवेंत पाहिलें काम रसदीचें ॥ बक्षी खुमानसिंग[1] आफीसर जंगी रिसाल्याचें । संभावित रित पाहुन गाती लोक गीत याचें ॥ (मिळवणी०)॥ पलटणीचे कर्नेल भीमगिर गांव याचें पुणें । कवायतीच्या कामीं केले लोक त्यानें शहाणे ॥ राजधानी० ॥ ९ ॥

ऐसीं हुजुरीं चतुर माणसें पदरीं राज्याच्या । गणेश सिताराम वकिल लिहिण्यांत होते इंग्रजीच्या ॥ रामचंद्र भाउची जीवाला कुमक होळकराच्या । होती रात्रंदिवस परंतु सत्ता हातीं ज्याच्या ॥ नोकीं तीळमात्र कामाचीं दुर्बल प्रजेच्या । शहर देशदाणीच्या सुधारणा केल्या मेंजाच्या ॥ आतां कसें वर्णन कोठवर किती ह्मणून करणें । राजधानीची जागा इंदुर माळव्यांत राहणें ॥ १० ॥

होळकराची स्वारी फारा दिसा पुण्यास आली । बेतबात पाहून पुण्यांतिल मंडळि खुष जाहली ॥ कांहीं दिवस राहून स्वारी मुंबईस गेली । दोन्हीं ठिकाणीं उत्तम कीर्ती संपादन केली ॥ सुधारणुकीचें स्थळ जें त्यानें सर्व जाउन पाहिलें । जसी योग्यता ज्याची तैसे बक्षीसहि दिधलें ॥ (मिळवणी०)॥ विद्वानांला द्रव्य देऊन वर दिलीं भरणें । विन्मुख जाउन दिधला नाहीं याचक जसा कर्णें ॥ राजधानीची० ॥ ११ ॥

---

१ हयात आहेत.

कैक ठिकाणीं महाराजांला पाहुणचार। सवड मिळेना ह्मणून एक्या दिवशीं दोन चार। नाहिं दुखविलें मन कोणाचें अंगीं सुविचार ॥ मोठमोठे झाले प्रसंग परंतु नाहिं अनाचार। अशा रितीमुळें महाराजांपुढें झाले लोक लाचार ॥ होळकराची प्रजा सुखी असो मुख्य सदाचार। व्हावें दक्षिणदेशीं हमेशा राजाचें येणें ॥ इच्छा सर्वत्रांची परंतु नशिबानें घेणें ॥ राजधानीची० ॥ १२ ॥

ऐशी स्वारी गेली कीर्ति मिळवुन इंदुराला। जागोजागीं दिलीं भोजनें सुंदर विप्रांला ॥ आशीर्वाद देति राणीच्या मंगळसूत्राला। अखंड असो सौभाग्य उभयतां विजय पुत्रांला ॥ पारनेरचा कवी नागनाथ[1] केशव पवित्राला। पवित्र ह्मणावें काय अधिक यांत सांगें विप्राला॥(मिळवणी०)॥ छंदभंग सुरभंग करुन तुह्मि नका गावुं गाणें। पुरषोत्तम बाळा सांगतों गावें आनंदानें ॥ झिलकरी लखुपुणेंकर कृष्णा ह्मणतो विनोदानें। भाव करुन भुलवावें जनांला आपल्या छंदानें ॥ राजधानीची जागा० ॥ १३ ॥

---

## १७. पोवाडा तुकोजीराव महाराजाचा.

तुकोजिराव राजेंद्र नरेंद्र पुण्यशीळ भूपती। बद्रिकाश्रम उत्तमधाम जाउंपाहुं सत्वरगती ॥ १ ॥ ध्रु०॥ रावराजेंद्रा चंद्रनरेंद्रा जन्म होळकरकुळीं। इष्टमित्र गणगोत्र बराबर घेउनिया मंडळी ॥ शके अठराशें चार स्वारिचा बहार जमुनी सकळीं। रेलरस्त्यानें निघुनी चालले केलें आजमिर जवळी ॥

---

१. नागनाथ केशव पोळ हे इंदुरास त्यावेळीं फडणिसींत कारकुन होते, व त्यांचे चिरंजीव बापुजी नागेश हल्लीं महेश्वरी नोकर आहेत.

खाजेसाहेबांचें दर्शन केलें जाउनियां सकळीं । शिखानष्टांनीं दाटि करुनी त्रासविलें तेवळीं ॥ चाल ॥ तेथुनी सत्वर कुच करुनी असा भूपती ॥ निघाले आग्र्यावरुनी असा भूपती । चार दिवस जयपुरीं ठरुन असा भूपती ॥ ( मी० ) ॥ दृष्टि-भरुनी रामपुर[1] पाहीलें आनंद सकळांप्रती । नवाबानीं देउनी मेजवानी तोषविली चित्तवृती ॥ तुकोजीराव० ॥ १ ॥

हरिद्वाराचा रस्ता धरिला सारंगपुर देखिले । उंटगाडीवर वसुन सर्व रोडकीला पोहेंचले ॥ गंगेच्या नहरांतुनी मार्गिं नावेमधीं बैसले । चौघटकांमधिं चार योजनां हरिद्वार पाहिलें । स्नानें दानें विधी कराया पंड्याला बाहिलें ॥ बैरागी संन्यासि तापसी साधुजन च्याहिले ॥ चाल ॥ मुबलक द्रव्या वाटिलें असा भूपती ॥ अगणित यश जोडिलें असा भूपती । पदरिंचे लोक सुखविले असा भूपती ॥ ( मी० ) ॥ सत्कर्मानें आ-पण तरले प्रजेसही तारिती । ऋषी तापसी सदा भुपाचें कल्याणच चिंतिती ॥ तुकोजीराव० ॥ २ ॥

बहुत मुक्काम तिथें करुनी निघाले टाकुनी कजलीब-नासी । अडीच योजन निघुन गेले वर पावले हृषीकेशीं ॥ चौमनुष्यांची येक झपाण दंडी दोमाणसी । करंडी ह्मणजे जसे टोपले येक मनुष्य येकासी ॥ लष्कर बरोबर फारच जमले रीघ न मिळे मार्गासी ॥ चाल ॥ झंपानमार्गें झंपान असा भूपती । पहाडीला इनाम देउनी असा भूपती ॥ देव-प्रयागासी पाहुनी असा भूपती । ( मी० ) तेथिल विधी सा-रुनी निघाले रुद्रप्रयागाप्रती । विधी करुनी कर्णप्रयागा जाऊं शीघ्रगती ॥ तुकोजीराव० ॥ ३ ॥

कर्ण प्रयागीं विधी सारिला तीन रात्र राहुनी । स्वारी नि-

---

१ बरेली रामपुर.

चाली यात्रा चालली पुलाच्या वरुनी ॥ नंदप्रयागीं स्नानें दानें विधी अवघा सारुनी । तेथुनियां पुढें गरुडगंगे पाताळगंगे जाउनी ॥ लालसांगा आणि पींपळचट्टी कुंभारचट्टी टाकुनी । तेथुनियां पुढें कुच केलें जोशिमठालागुनी ॥ चाल । त्यासी विष्णुप्रयाग बोलती असा भूपती ॥ शृंखळा धरुनी हाती असा भूपती । जडमूढ स्नानें उद्धरती असा भूपती ॥ मी० ॥ पंचप्रयागीं विधी सारिला यथासांग यारितीं । तेथुनियां पुढें कुच केलें दंडकेश्वरा चालती ॥ तुकोजीराव० ॥ ४ ॥

पंडुराज जिथें चौसर खेळले तेथें निशाण लाविलें । तेथुनीयां पुढें हनुमंतचट्टीवर दोनघडी थांवले ॥ पहाडावरती पहाड दिसती जणु बर्फानें झांकले । नदिला नाहीं कोठें उतारा सकळजनीं देखिलें ॥ दृष्टीं पडावें उदक न मीळे पाणी कंठ शोषले । तीनशें हात चारशें हात उंच वृक्ष ठाकले ॥ चाल ॥ यापरिचा मार्ग क्रमिला असा भूपती । नारायण जवळी आला असा भूपती । सर्वांनीं कळस पाहिला असा भूपती ॥ मी० ॥ श्रम हरला अवघ्याचा जयजयकार बोलती । बद्री विशाल हीच गर्जना घडोघडीं गर्जती ॥ तुकोजिराव० ॥ ५ ॥

नारायणासी वस्त्रभूषणें अळंकार चढविले । लक्ष ठेउन सर्वसाक्ष पहाता ध्यान बहुत आवडलें ॥ तप्तकुंडाचें स्नान पतीता दोषांतुनी काढिलें । ब्रह्मकपाटीं पिंड देतां वैकुंठिं पितर धाडिले । जिकडे तिकडे बद्री विशाळ सर्वांमुखीं पढविलें ॥ होळकरकुळीं महाबळीं जन्मुनी पदरीं यश जोडिलें ॥ चाल ॥ पाहिली मूर्त भरून असा भूपती । नारायण हृदयीं धरून असा भूपती ॥ पंचरात्री मुक्काम करून असा भूपती ॥ मी० ॥ गेली कीर्ती मुलखिं पसरुनी पहाडी लोक गर्जती । दर मुक्काम दरकुच करूनी नैनीताल देखती ॥ तुकोजीराव० ॥ ६ ॥

कृतयुगामध्यें सत्यलोकां गेला नारदमुनी । विरिंचीचें गायन ऐकतां आनंदला बहु मनीं ॥ असें गायन जर शिव ऐकेल तर खुषी होईल शुळपाणी । सत्वरगतिनें जाउन शिवाला घेउन येकते क्षणीं ॥ सांब भोळा संगें मेळा पार्वति आणि स्वर्धुनी । गंधर्वमुखीं बदसुर निघतां वितळली रागिणी ॥ चाल ॥ हास्य करूनी पार्वतीकडे त्याणीं पाहिलें । तात्काळ शिवानीं तिकडे अवलोकिलें ॥ त्रिशूळानीं करुनी तुकडे शीर टाकिलें ( ॥ मी० ॥ ) त्यांतुन निघाले ब्रह्मकपाट लागे शिवा-भोंवतीं । अशा संकटीं धांव अनंता पडलों दुष्टां हातीं ॥ तुकोजीराव० ॥ ७ ॥

ब्रह्मकपाटांतुनी वीर निघाला नांव सहस्रकवचें बोलिला । यास्तव नरनारायणआवतार विष्णूनें धरिला ॥ नारायणानें तप करावें नर त्यासी झुंझला । दहा हजार वर्षें युद्ध होता शतकवचें उरला ॥ शंभर कवचें राहता पळाला इंद्राआड राहिला । शिव गुप्तरूपी राहत होता केदारें लोपला ॥ चाल ॥ तो वाळी पुढें जन्मला त्रेतायुगासी । नरसुग्रीव आसे बोलीला त्रेतायुगासी ॥ राम नारायण चांगला त्रेतायुगासी ॥ मी० ॥ बिनअपराधी वाळी मारिला तोच कर्ण उत्पती । अर्जुन नर हें माहित सर्वां चतुर लोक जाणती ॥ तुकोजीराव० ॥ ८ ॥

विरथ होतां कर्ण टाकिना बाण तेव्हा अर्जुन । टाकी झडकरी बाण पार्था बोले नारायण ॥ शीर उडविल्या कथा सांगितली सविस्तर कथुनें । कर्णपर्वामधें श्रीहरिमुखें श्रवण करी अर्जुन ॥ तोची अवतार अनादि सिद्ध बद्री नारायण । ब्रह्मकपाट तेथें स्थापिलें अद्यापि पाहती जन ॥ चाल ॥ बारा मुक्काम करुनी रामपुरीं असा भूपती । सत्वर आले इंदुरीं असा भूपती ॥ रामचंद्राचा हात सीर असा भू-

पती ( मी० ) झाली यात्रा बरी गोविंद गाई वर्णुनी यथामती । कल्पतरूचें दर्शन होता दरिद्र दुःख नाशती ॥ तुकोजीराव० ॥ ९ ॥

---

## १८. पोंवाडा शिवाजीराव होळकर यांचा.

धन्य शिवाजीराव होळकर बुद्धिमंत बहादुर । राज्य-व्यवस्था सुखकर ज्याची सज्जनास प्रियकर ॥ नाहिं बुद्धीचा पार शिवाजी महाराज घडिभर । एकहि नाहीं हिंदुराजा बरो-बरिस भूवर ॥ कारभार करणार बहाद्दर लहानपणापासुनी ॥ वडिलांनीं सोंपून दीक्षा दिली गादिवर बैसूनी । अशामुळें दुधामधीं साखर ॥ कीं परजोन दिली तलवार । चोरांस दंडखंड सत्वर ॥ दुष्टांवर करि भडमार ॥ कारस्थानें मोडुन केलें राज्य सर्व सुखकर ॥ १ ॥ धन्य शिवाजीराव० ॥

राज्यपदावर बसते वेळीं नविन लोक ठेविले । तयांनीं कपट बहू मांडिलें ॥ खोटें नाटें बाहणें करूनी जुने लोक नाडिले । तयांना पळवुनियां लाविले ॥ महाराजानां ठकवून त्यांनीं राज्य-गृह फोडिलें । गरुड, नाना, जनरल, दादा, रामजि वकिल उडविले ॥ काशिरावदादास येथुनी । दिले परदेशीं लावुनी । मासाहेबास रंजवुनी ॥ केली राज्यकुळाची हानी । परी शिवाजी धन्य तोडिलें कपटजाळ सत्वर ॥ नेत्र उघडितां जाळी जैसा कंदर्पा हरिहर । धन्य शिवाजी० ॥ २ ॥

कपटशिरोमणि मरून गेला * * * * करुनी । ज्यानें चाणक्याची दीक्षा घेऊन बुडविला धनी ॥ कल्याणापरि शिष्या त्याचा ज्यास हाति घेउनी । त्याणें केली कारस्थानें तो-हि पळे येथुनी ॥ राहिले कितीएक काफर । पोटांत भरुन मत्सर ॥ खोटें कुभांड रचणार । राजा प्रजेस लूटणार ॥ चहाड मोठे

लुतेरे खोटे कपट ज्यांची तलवार । परि पुण्याई सरल्याविना नाहींच राहणार ॥ सात्याचा सारथी शंकर करील एकदम चुर ॥ ३ ॥ धन्य शिवाजीराव होळकर० ॥

महाराज सोडून जाळ हें पुण्यास गेल्यावर ॥ तेथ मिळविले नव मुत्सद्दी गुप्ते आणि बेदरकर ॥ कोतवालसाहिब आणिले न्याय देति सुखकर । नानकचंद शोधून काढले इनामदार सरदार ॥ आणिले फडणीस एक लाला । [1] * * चा शहानीशा केला ॥ * * * हकलिला । तंट्या डाकुसच तुडविला ॥ यापरि बसवुनि डाव बरोबर बुद्धिबळें मांडिला । हीशोबाचा खांदा [2] काढुन शहं चोरांना दिला ॥ बुद्धिमत्तेची कमाल केली धन्य धन्य होळकर । एका एकाहूनी एक अधिक कुळांमधिं जन्मतात दिनकर ॥ धन्य शिवाजीराव० ॥ ४ ॥

( अपुरा आहे ).

---

## १९. पोंवाडा थोरले मल्हारराव यांचा.

थोरले होळकर मल्हारराव होते ज्याचे नांवकरी । खुब केली तलवार सवाई मल्हार नांव साजे बहीरीं । गुज पुन्यावर घेउन लढाई यश आलयादया तरवारीं ॥ गंगथडीहुन तुडवित नेले करडी फौज बाकी सारी । चाल ॥ रावसाहेबाची बाकी फौज नई तुर्त भोगलें राज । दर्यांत बुडालें झाज । चोमुलकीं धौशावाज । होणार जाणार कधीं टळेना लिहिलें याच्या दैवांत ॥ आयुष्याची दोरी तुटली, कसा कोपला भगवंत । वाहव्वारे मल्हार राव खुब केलें नांव राहिलें शाईत ॥ लक्षजित्रांचा पालनवाला

---

१ अब्रूची हानि होऊं नये ह्मणून नांवें गाळलीं आहेत.
२ खांदा ह्मणजे बखेडा.

हिरा हारपला गगनांत ॥१॥ लाख्या बारगिर दरबार पाहुन आला हों सारी सेना ॥ लाखरुपये कोणी देइना हिय्या कुणाचा होईना । वाहव्वारे मल्हारराव नांव ऐकुन आलों तुमच्या दर्शना ॥ तेव्हां मल्हारराव काय बोलले ह्या लाखाचा परगणा ॥ चाल ॥ त्यानें लाख्या बारगीर ठेविला । एक घोडा बसायाला दिला । दहा माणसें सेवेला। नीत जेवत जा पंक्तिला ॥ नीवळ पांचशें रुपये मोजुन घातले याच्या पदरांत । असी दिवसाची कीतीक-झाले करा वरसाची गणित॥ वाहव्वारे मल्हारराव खुब केलें नांव राहिलें शाईत । लक्षजिवांचा पालनवाला हिरा हारपला गगनांत ॥२॥ लाख्या बारगिर मल्हारराव करीत बसले देवपूजा ॥ एका-एकीं झाली गर्दी अग्नि लागे दारुच्या गजा । लाख्या बारगिर दगा बोलला आतां मल्हारराव मनीं उमजा ॥ कां बसले गुंगुन घडीभर ठेवा गुंडाळुन देवपूजा ॥ रावमल्हार उठले अंग हातीं घेउन ढाल फिरंग ॥ हा पुढ सैन्य मागतो लाख्या बारगीर संग ॥ होती जोंधाची राख । वर्जुलागली बसा तुह्मी डेऱ्यांत ॥ तिला दिल लोटुन मल्हारराव आले रागा क्रोधांत ॥ वाहव्वारे मल्हार-राव खुब केलें नांव राहिलें शाईत । लक्षजिवांचा पालनवाला हिरा हारपला गगनांत ।३। लाख्या बारगिर मल्हारराव जसा रणा-मधें रणनवरा । दारूच्या अमलांत झमाझम उडूलागल्या तलवारा ॥ माणुस पडला फार सेना पाहूलागली भिरभीऱ्या । दहावीस सरदार संगतिं इमानाचा होता पुरा । सईमर्दी माया-चा पुत । गोळी भरून सेरधच्यांत ॥ पाहुन मार छातींत राव-मल्हार केले चित । लाख्या बारगीर मागुन पडला प्रेतावर पडलीं प्रेत ॥ चोपदार खोसमतदार ह्या चौघांची ऐकमोत । वाह-व्वारे मल्हारराव खुब केलें नांव राहिलें शाईत । लक्षजिवांचा पालनवाला हिरा हरपला गगनांत ॥ भलेभले सरदार करती

विचार ॥ मनामधीं चकचकतीं कांहीं बरें नाहीं झालें मल्हार-
राव सोती आपली बाजु होतीं इथें आपुण काय करावें । उपाय
नाहीं आपल्या हातीं सवाई मल्हारराव बाहादर जसा दलामधीं
दलाहातीं ॥ आवघे होळकर बोलवा तुम्ही करा रायाची सेवा
पुण्यासी थडग लावा खंडेरावा जतन करा होळकराच्या राज्या-
मधीं होते मल्हारराव सपुत । काय सांगूं थडग्याची मात आ-
जुन चालले ॥ हे वाहव्वारे मल्हारराव खुब केलें ॥ थोरल्या सु-
भेदाराचा जोडला असे पवाडा बहुता दिवसा आंतपची वा--
जुन गेला चवघडा ॥ लाख्या बारगिर कुनीं नाहीं ठेविला । थोर
तया गाडा केला । रावसाहेबाचे पुण्यप्रतापी पोषाख शोभी त्याला॥
पुढें होणार जाणार ब्राह्मणाच अक्षर हें कदा नाहीं चुकणार
गातो राणु सुतार निशाण डफावर फतीं फाकडा घोंडीशिपाई ।
राहतो उंदिर खेड्यांत बसुनिया एकांत पवाडा केला शहर
पुण्यांत ॥ वाहव्वारे मल्हारराव खुब केलें नांव राहिलें शाईत ।
लक्षजिवांचा पालनवाला हिरा हरपला गगनांत ॥

समाप्त.